म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा
दा. क्र. : १६६२

१६६२

BVBK-0401662
BVBK-0401662

आमची मानसकन्या ओवी.

butyful :- Story

वा वा १६६२

आमची मानसकन्या गोष्टीवेल्हाळ सौ. क्षमा (माई) देशपांडे
हिच्या मंगल स्मृतीस अर्पण-

BVBK-0401662
BVBK-0401662

## ऋणनिर्देश

या पुस्तकात निरनिराळ्या देशांतील प्रचलित पारंपरिक लोककथांचे स्वैर पुनर्निवेदन आहे. या गोष्टींच्या अज्ञात मूळ लेखकांचे ऋण मान्य करणे मी माझे कर्तव्य समजते. या कामात माझे पती श्री. नानासाहेब वर्तक यांनी उत्तेजन देऊन बहुमोल साहाय्य केले याबद्दल मी त्यांची कृतज्ञ आहे. सौ. रेखा हर्डीकर यांनी प्रकाशनाची जबाबदारी आनंदाने स्वीकारली याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

सौ. उषा वर्तक

ग्रा वा १६६२

## तिबेटचा राजदूत

एका चिनी राजाला वेनचेंग नावाची सुंदर मुलगी होती. तिचे लग्नाचे वय झाले होते. शेजारच्या राज्यांतून तिला लग्नासाठी मागण्या येत होत्या. दूरवरच्या तिबेट राज्यातूनही तिला मागणी आली होती. एकूण सात राज्यांचे राजदूत मागणी घेऊन आले होते. तिबेटचा राजदूत फार हुशार व वस्ताद होता.

तिबेट फार दूर होते त्यामुळे राजकन्येला इतक्या दूर पाठविण्याची राजाची इच्छा नव्हती. पण हे टाळायचे कसे? राजाला चिंता वाटत होती. त्याने आपल्या मंत्रिमंडळाबरोबर चर्चा केली. त्यांनी सर्व राजदूतांची कडक परीक्षा घ्यावी असे सुचविले. त्या परीक्षेत तिबेटचा राजदूत हरला, तर इतर जवळच्या सहा राज्यांतून एका राजपुत्राची निवड करता आली असती. राजाने मंत्रिमंडळाचा सल्ला मान्य केला व दुसऱ्या दिवशी त्या सात राजदूतांची परीक्षा घेण्याचे ठरविले.

राजवाड्यात पाचशे घोड्या व त्यांची पाचशे शिंगरे आणण्यात आली. शिंगरांना मैदानात सोडण्यात आले आणि पाचशे घोड्यांना मैदानासभोवती खुंटांना बांधण्यात आले. मग राजा म्हणाला, "मला सातही राज्यांच्या राजपुत्रांबद्दल आपुलकी वाटते. मला जर सात मुली असत्या तर प्रत्येकाला माझी एक मुलगी दिली असती. पण मला एकच मुलगी आहे. त्यामुळे मला फक्त एकाचीच निवड करावी लागेल. त्यासाठी मी तुमची परीक्षा घेणार आहे. परीक्षेतील पहिल्या चाचणीसाठी मी येथे पाचशे घोड्या व त्यांची पाचशे शिंगरे आणली आहेत. तुम्ही आता प्रत्येक घोडीला तिचे शिंगरू द्यावयाचे. जो राजदूत यशस्वी होईल त्या देशाच्या राजपुत्राशी राजकन्येचे लग्न लावून देण्यात येईल."

शेजारच्या सहा राज्यांतील राजदूतांनी घाईघाईने जोड्या लावण्याचा उद्योग सुरू केला. तिबेटचा राजदूत मात्र त्या सहा जणांचा उद्योग पाहत

गप्प होता. भलतेच शिंगरू जवळ येताच घोड्या लाथा झाडीत होत्या. त्यामुळे शिंगरे घोड्यांजवळ जाण्यास घाबरत होती.

शेवटी तिबेटच्या राजदूताची पाळी आली. त्याने सर्व घोड्यांसाठी चांगले खाद्य आणविले. सर्व घोड्या शांतपणे पोटभर खाऊ लागल्या.

खाणे संपताच त्या खिंकाळून शिंगरांना बोलावू लागल्या. त्यांना पान्हा फुटत होता. सर्व शिंगरे आपापल्या आईजवळ गेली व आनंदाने दूध पिऊ लागली. तिबेटच्या राजदूताची युक्ती सफळ झाली होती.

पण राजाला मनातून तिबेटच्या राजदूताला जिंकू द्यायचे नव्हते. त्याने दुसरी चाचणी जाहीर केली. राजाने एक नक्षीदार हिरेजडित सोन्याचे मोठे पदक काढले व तो म्हणाला, "हे मोठे सुंदर पदक पाहा. या पदकाला वेडेवाकडे जाणारे भोक आहे. त्या भोकातून रेशमी दोरा घालता येतो आणि पदक गळ्यात घालता येते. तुमच्यापैकी जो कोणी या नक्षीदार पदकाच्या नागमोडी भोकातून दोरा घालून दाखवील तो विजयी होईल."

तिबेटच्या राजदूताने इतर सहाजणांना आधी प्रयत्न करण्यास सांगितले. पण कोणाला ते जमले नाही. कारण त्या पदकाला अनेक वेडीवाकडी वळणे होती व त्यांमधून ते भोक जात होते. शेवटी तिबेटच्या राजदूताला प्रयत्न करण्यास सांगण्यात आले. त्याने एक मोठी मुंगी पकडली व तिच्या पायाला रेशमी दोऱ्याचे एक टोक बांधले. पदकाच्या भोकाच्या टोकाला त्याने मधाचा एक थेंब लावला. मुंगीला भोकाच्या दुसऱ्या टोकातून पदकात सोडण्यात आले. तिला भोकातून टोकाला लावलेल्या मधाचा वास आला. ती सरळ आतून नागमोडी वेडीवाकडी वळणं घेत दोऱ्यासह दुसऱ्या टोकातून बाहेर आली. राजदूताने दोऱ्याची दोन्ही टोके बांधली आणि पदक राजाच्या हातात दिले. राजाला फार आश्चर्य वाटले. तिबेटच्या राजदूताने दुसरीही चाचणी जिंकली होती.

राजाला मनातून ते पटत नव्हते. म्हणून त्याने तिसरी चाचणी घेण्याचे ठरविले. त्याने सुताराला लाकडाचा एक ओंडका पॉलिश करून आणण्यास सांगितले. त्या ओंडक्याची दोन्ही टोके अगदी सारखी दिसत होती. राजाने तो ओंडका साती राजदूतांना दाखविला.

राजा म्हणाला, "हा ओंडका तुम्ही पाहिलात. या ओंडक्याची दोन्ही टोके पहा. अगदी सारखी दिसतात. तुम्ही मला हे सांगायचे की या ओंडक्याचे झाडाच्या शेंड्याकडील टोक कोणते व मुळाकडील टोक कोणते. अंदाजे सांगायचे नाही. कारण देऊन सांगा."

जवळच्या सहा राज्यांतील राजदूतांनी ओंडका उलटसुलट करून पाहिला. पण त्यांना काही सांगता आले नाही. मग तिबेटच्या राजदूताची पाळी आली. त्याने तो ओंडका पाण्यात टाकून पाहण्यास सांगितले. पाण्यात टाकला की जड टोक खाली राहाते व हलके टोक वर तरंगते. तसेच पाण्यातून वाहताना जड टोक मागे राहाते व हलके टोक पुढे राहाते. ओंडका नदीत टाकण्यात आला व त्याने ताबडतोब मुळाकडचे व शेंड्याकडचे अशी दोन्ही टोके बरोबर ओळखली. तिबेटच्या राजदूताने तिसऱ्यांदा जिंकले होते.

पण राजाला अजून आशा वाटत होती. त्याने आपल्या मंत्रिमंडळाशी गुप्तपणे चर्चा केली व अखेरची चाचणी जाहीर केली. राजकन्येसारख्या साधारणपणे दिसणाऱ्या व तिच्या वयाच्या तीनशे मुली जमा करण्यात आल्या. त्यांना सारखे पोशाख घालण्यात आले. राजकन्येलाही त्यांच्यात सामील करण्यात आले. या तीनशे मुलींमधून राजदूतांनी राजकन्येला नेमके ओळखून काढायचे होते.

प्रथम सहा जवळच्या राज्यांच्या राजदूतांनी प्रयत्न केला. त्यांना वाटले की राजकन्या सर्वांत सुंदर असावी म्हणून त्यांनी तशी निवड केली आणि ते हरले.

तिबेटच्या राजदूताने या वेळात राजकन्येची राजवाड्यातील नोकरचाकरांकडे बारकाईने चौकशी केली. शेवटी त्याला एक धोबीण भेटली. प्रथम ती काही बोलेना. तिला भीती वाटत होती. कारण राजवाड्यात एक जादूगार होता. त्याच्यामार्फत राजा सर्वांवर नजर ठेवीत असे. तिबेटच्या राजदूताने तिची भीती घालविली. तो म्हणाला, "तू असं सांग." त्याने मग तीन पांढरे दगड चुलीसारखे मांडले. त्यावर पाणी भरून एक मोठी कढई ठेवली. मग त्यावर एक आडवे बाक ठेवले आणि त्यावर धोबिणीला बसविले. तिच्या हातात एक पितळेचा

कर्णा दिला व त्यातून बोलण्यास सांगितले. तो तिला म्हणाला, "तू असं केलंस म्हणजे जादूगार राजाला सांगेल, 'सांगणारा लाकडी पर्वतावर राहातो. हा लाकडी पर्वत लोखंडी समुद्रावर आहे. समुद्राखाली तीन पांढरे पर्वत आहेत. सांगणारांचे तोंड पितळी आहे' त्यामुळे राजाला काही कळणार नाही." मग तिने सांगितले की, "राजकन्या फार सुरेख नाही. ती अगदी पुढच्या किंवा अगदी मागच्या रांगेत नाही. ती मधेच कुठंतरी आहे. राजकन्येने केसांना खास तेल लावले आहे. त्या तेलाचा वास मधमाशांना फार आवडतो. त्यामुळे एखादी मधमाशी तिच्या डोक्याजवळ घोंगावताना तुम्हाला दिसेल. तिला मधमाशा आवडतात. इतर मुली ते तेल लावीत नाहीत. ते ती परदेशातून मागविते."

तिबेटच्या राजदूताने तिला धीर दिला व तिचे आभार मानले. मग तो परीक्षेला गेला. सर्व मुलींचे काळजीपूर्वक निरीक्षण करू लागला. त्याला मध्यभागी एका मुलीच्या केसाभोवती एक मधमाशी घोंगावताना दिसली. ती प्रेमाने त्या माशीकडे पाहत होती. त्याने त्या मुलीकडे बोट करून ती राजकन्या आहे हे सांगितले. तीच राजकन्या होती. सर्वांना फार आश्चर्य वाटले. राजाला संशय आला. त्याने जादूगाराला बोलावून विचारले. जादूगाराने ठराविक बडबड केली, पण राजाला त्यावरून काही पत्ता लागला नाही.

राजाला शेवटी तिबेटच्या राजदूताचा विजय मान्य करावा लागला. त्याने राजकन्येची त्याच्याशी ओळख करून दिली. राजदूत म्हणाला, "तुझे अभिनंदन असो. आमच्या तिबेटच्या राजपुत्राशी तुझा विवाह होणार याचा मला आनंद वाटतो. तू माझ्याबरोबर तिबेटला येशील, त्या वेळी राजा तुला अनेक भेटी देईल. आमच्या राजाजवळ सर्व गोष्टी आहेत. त्यामुळे तू जडजवाहीर, रत्ने, माणके इत्यादी काही घेऊ नकोस. तर त्याऐवजी सर्व प्रकारची धान्ये राजाला तुला द्यावयास सांग. ती आम्ही बियाणं म्हणून वापरू आणि आमची शेती सुधारू." राजकन्येने ते मान्य केले.

राजाने तिच्याबरोबर पाचशे घोड्यांवर निरनिराळया प्रकारच्या धान्यांचे उत्कृष्ट बियाणे दिले.

तिबेटचा राजदूत व राजकन्या लवाजम्यासह तिबेटला रवाना झाली..

---

## गाणारे ढोलके

आफ्रिका खंडातील पूर्व किनाऱ्यावरच्या एका गावातील ही गोष्ट आहे. त्या गावातील काही मुली गावाजवळील समुद्रकिनाऱ्यावर खेळत होत्या. शाळेला सुटी असल्यामुळे त्या खूप वेळ शंख, कवड्या व शिंपले गोळा करून त्यांच्या माळा बनवीत होत्या. सर्व मुलींनी शंख शिंपल्यांचे ढीग जमा केले होते.

एका लहान मुलीला मोत्यासारखा चमकणारा एक सुंदर शिंपला सापडला होता. तो तिने एका खडकावर इतर शिंपल्यांपासून दूर ठेवला होता. थोड्या वेळाने सर्वजणी घरी जायला निघाल्या. थोडे चालल्यानंतर त्या सुंदर शिंपल्याची आठवण झाली. तो खडकावरच राहिला होता. ती म्हणाली, "मी माझा उत्तम शिंपला तेथे खडकावरच विसरले. तो आणायला मला परत जायला पाहिजे. कोणीतरी माझ्यासोबत चला."

"तुझ्याजवळ खूप शिंपले आहेत." काही मुली म्हणाल्या, "तो जाऊ दे."

"नाही नाही. तो मला पाहिजे. तो फारच सुंदर होता." ती म्हणाली

"मग तू एकटी जा व तो शिंपला घेऊन ये." काही मुलींनी सुचविलं. "उशीर झाला. आम्ही आता घरी जातो."

ती मुलगी हिरमुसली झाली व एकटीच शिंपला आणायला माघारी गेली. ती गाणं म्हणत धावत धावत खडकाजवळ आली, पण त्या खडकावर एक राक्षस गारूड्याचे रूप घेऊन बसला होता. ती घाबरली. राक्षस म्हणाला, "ये. मुली, ये. जवळ ये. मला गाणं म्हणून दाखव." घाबरत घाबरत ती एक एक पाऊल टाकत पुढे आली व तिने एक गाणे

म्हटले. राक्षस म्हणाला, "तुझा आवाज फार गोड आहे." त्याने खडकावरचा तिचा शिंपला उचलून आपल्या हातात घेतला व म्हटले, "आणखी एकदा गाणं म्हण म्हणजे हा तुझा शिंपला तुला देईन."

त्या मुलीने पुन्हा एक गाणे म्हटले व तो शिंपला घेण्यासाठी आपला हात पुढे केला. राक्षसाने तिचा हात पकडला व तो म्हणाला, " आता मी तुला पकडलं. तू माझ्याकडेच राहा आणि मी सांगेन तेव्हा गाणं म्हण."

राक्षसाने खडकामागून त्याचे मोठे ढोलके बाहेर काढले आणि त्या मुलीला त्या ढोलक्यात बंद करून टाकले. तो मुलीला म्हणाला, "मी जेव्हा ढोलकं वाजवीन त्या वेळी तू आतून गाणं म्हणायचं. गाणं नाही म्हटलंस, तर मी तुला मार देईन."

खांद्याला ढोलके अडकवून तो जवळच्या गावाच्या बाजाराला गेला. तेथे चौकात उभे राहून तो लोकांना मोठ्याने ओरडून सांगू लागला,



"लोकहो, तुम्ही मला अन्न व पैसे द्या. म्हणजे मी हे जादूचं ढोलकं वाजवून दाखवीन. हे गाणारं ढोलकं आहे."

लोकांनी त्याला अन्न व पैसे दिले. तो ढोलके वाजवू लागला. मुलगी आतून गाणं म्हणत होती. लोकांना ते गाणारे ढोलके फार आवडले. ते ढोलक्याच्या तालावर नाचू लागले. काही वेळाने तो राक्षस ढोलके खांद्याला अडकवून दुसऱ्या गावाला गेला.

त्या गावी त्याने दारू व पैसे मागितले. त्याने ढोलके वाजवायला सुरवात केली. मुलगी गाऊ लागली. लोक नाचू लागले. पण त्या गावात त्या मुलीचे आईवडील राहात होते. त्यांनी मुलीचा आवाज ओळखला व तिची सुटका करण्याचा विचार केला.

त्यांनी त्या राक्षसाला खूप दारू पाजून बेहोष करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी आग्रह करून त्याला खूप खूप दारू पाजली. तो चांगलाच झिंगला व झोपी गेला. तो पूर्णपणे बेहोष झाला होता. मुलीच्या आईवडिलांनी त्या मुलीला ढोलक्यातून बाहेर काढले. पण मुलीच्या बाबांनी त्या ढोलक्यात दोन मोठे साप, काही मधमाशा, गांधीलमाशा आणि चावऱ्या मुंग्या भरल्या व ते पहिल्यासारखे बेमालूम बंद केले. ते ढोलके राक्षसाजवळ ठेवून मुलीसह ते घरी निघून गेले.

सकाळी राक्षस उठला व परत जाण्यासाठी तयारी करू लागला. पण गावातील काही लोकांनी जाण्यापूर्वी परत एकदा ढोलके वाजविण्याचा आग्रह केला. त्याने ढोलके वाजविण्यास सुरवात केली. पण ढोलक्यातून मुलीचा आवाज येईना. खेडूत हसू लागले. त्यांनी त्याची टिंगल सुरू केली. त्याने बाजूला जाऊन ढोलके उघडून मुलीला दाटण्याचे ठरविले.

तो बाजूला गेला व ढोलके एका बाजूला उघडले. मधमाशा आणि गांधील माशा बाहेर आल्या. त्या त्याच्या तोंडाला सगळीकडे कडकडून चावल्या. सापांनी त्याला दंश केला. मुंग्या त्याच्या अंगावर पसरल्या व त्याला जोरात चावू लागल्या. राक्षस बेशुद्ध झाला व थोड्या वेळाने मरण पावला. ढोलके त्याच्या बाजूला पडले होते.

दुसऱ्या दिवशी त्या मुलीच्या बाबांना ते शिकारीला जात असताना तो राक्षस मरून पडलेला दिसला. त्यांना बरे वाटले. संध्याकाळी ते परत आले तर त्यांना राक्षसाचे प्रेत व ते ढोलके नाहीसे झालेले दिसले आणि त्या जागी एक मोठा लाल भोपळयाचा वेल उगवलेला दिसला. त्यांनी खेड्यातील लोकांना याची कल्पना दिली आणि त्या जागी जाऊ नका अशी सूचना केली. वेलावर येणाऱ्या भोपळयात बसून राक्षस लोकांना त्रास देतात हे त्यांना बजावले.

काही दिवसांनी त्या भोपळयाच्या वेलाजवळ काही मुले धनुष्यबाण घेऊन खेळत होती. त्या भोपळयाच्या वेलावर मोठमोठे भोपळे लागले होते. एक मुलगा म्हणाला, "किती मोठे भोपळे आहेत!" दुसरा मुलगा म्हणाला, "त्यांना हात लावू नको. ही भुताटकीची जागा आहे." पण त्या मुलाने ते मानले नाही. तो म्हणाला, "भित्रटासारखा बोलू नकोस. काही होत नाही. मी एक भोपळा घरी घेऊन जाणार." इतर मुलांनीही त्याला विरोध केला. तरी तो मुलगा एका भोपळयाजवळ जाऊन त्याला तोडू लागला. तो भोपळा त्याच्या अंगावर धावून आला व मुलगा खाली पडला. इतर मुले घाबरून पळून गेली. तो मुलगा कसाबसा उठला आणि इतर मुलांच्या मागोमाग निघाला. मुलांनी मागे वळून पाहिले. भोपळा त्यांचा पाठलाग करीत येत होता. मुलं ओरडली व ओरात पळू लागली. मुलांच्या लक्षात आले नाही की ती त्यांच्या गावाकडे न पळता विरुद्ध दिशेला पळत होती व गावापासून दूर जात होती.

शेवटी ती मुलं एका नदीजवळ आली. तेथे होडीत एक म्हातारा बसला होता. "वाचवा, मदत करा" ती मुलं ओरडली, "जादूचा भोपळा आमच्या मागं लागला आहे." ती मुले कशीबशी होडीत बसून पैलतीराला गेली. पण तो भोपळा त्यांच्या मागे येतच होता. ती मुले एका गावाजवळ आली. तेथे चौकीत बरीच माणसं गप्पा करीत बसली होती. "मदत करा, वाचवा. जादूचा भोपळा आमचा पाठलाग करीत आहे." मुले म्हणाली. त्यांनी मुलांना घरात लपविले.

थोड्या वेळाने तो भोपळा तेथे आला व म्हणाला, "ती मुलं मला परत द्या." मुलं घरातून ऐकत होती. एक खेडुत म्हणाला, "तलवार काढा व

भोपळयाचे बारीक तुकडे करा." दुसऱ्याने तलवारीने भोपळयाचे बारीक बारीक तुकडे केले. पहिला खेडुत म्हणाला, "मुलांनो बाहेर या. आपण भोपळा जाळून टाकू." मग सर्वांनी एक मोठी शेकोटी केली आणि भोपळयाचे तुकडे भाजले. मग त्यांनी भोपळयाची राख नदीत टाकून दिली.

नंतर ती मुले आपल्या गावी परत गेली. त्यांनी आईबाबांना त्या भोपळयाची गोष्ट सांगितली. सर्व मुलांनी गाणी म्हटली आणि नाच केला. सर्व मुली गळयात शंख-शिंपल्यांचे हार घालून गाणी म्हणत नाचत होत्या.

---

## डॉक्टर सर्वज्ञ

एकदा एक ज्योतिषी घरात जेवावयास बसले असताना त्यांच्या नोकराने आत येऊन त्यांना सांगितले की, "एक खेडूत लाकडं भरलेली गाडी घेऊन आला आहे. त्याने आणलेली जळाऊ लाकडं रचून ठेवली आहेत व तो पैसे मागत आहे."

ज्योतिषानी त्या खेडूताला आत बोलाविले व विचारले, "तुला किती पैसे द्यायचे?" तो म्हणाला, "चाळीस रुपये." ज्योतिषानी त्याला पैसे दिले व थोडे खावयासही दिले. खेडुताला बरे वाटले. ते ज्योतिषी जोडधंदा म्हणून डॉक्टरकीही करीत असत. खेडुताच्या मनात विचार आला, 'डॉक्टर व ज्योतिषी होणं किती चांगलं असतं? भरपूर पैसा मिळतो. मीपण त्यांच्यासारखा डॉक्टर, ज्योतिषी झालो असतो, तर किती बरे झाले असतं." त्याने आपला विचार डॉक्टरांना बोलून दाखविला. ते म्हणाले, "त्यात काय अवघड आहे? फार सोपं आहे ते. तुझी गाडी व बैल विकून टाक. एक पांढरा झगा विकत घे. घरावर एक नावाची पाटी लाव. तुझं नाव काय?" "माझं नाव हलवा." तो म्हणाला, "हे नाव बदलून टाक. स्वतःची डॉ. सर्वज्ञ म्हणून पाटी लाव. तुझ्याकडे

लोक गर्दी करतील."

हलवा त्यांचे आभार मानून घरी आला आणि त्याने गाडी व बैल विकून टाकली. पांढरा गाऊन खरेदी केला. घरावर डॉ. सर्वज्ञ म्हणून पाटी लावली. काही जुजबी औषधं, पंचांग पुस्तके खरेदी केली. लोक त्याची पाटी वाचू लागले. त्याच्याकडे लोकांची गर्दी होऊ लागली. हळूहळू त्याचा जम बसू लागला.

काही दिवसांनी त्याच्या घरासमोर एक सुंदर घोडागाडी येऊन उभी राहिली. गाडीवर सोनेरी अक्षरे होती. गाडीतून एक लष्करी पोशाखातील सैनिक उतरला. ती एका मोठ्या सरदाराची गाडी होती. तो सैनिक 'हलवा' ला सलाम करून म्हणाला, "आपण डॉ. सर्वज्ञ ना? मी सरदारसाहेबांकडून खास निरोप घेऊन आलो आहे. त्यांनी तुम्हाला भोजनाचं आमंत्रण दिलं आहे. त्यांचेकडे मोठी चोरी झाली आहे. तुम्ही सर्वज्ञ आहात. तुम्हाला या चोरीचा शोध लावायचा आहे. राजवाड्यात बरेच नोकरचाकर आहेत. त्यांपैकीच कोणाचंतरी हे काम असावं. तुम्ही चोराला शोधून काढालच. आपण लौकर निघावं. गाडी तयार आहे. मालक आपली वाट पाहत आहेत."

हलवाच्या बायकोचे नाव होते तेजू. तीही नवऱ्याबरोबर जाण्यास निघाली. तिला राजवाडा पाहण्याची व तेथे भोजन करण्याची उत्सुकता होती. हलवाने सैनिकाजवळ बायकोला मदतनीस म्हणून बरोबर घेत आहे असं सांगितले. "उत्तम. जरूर. घ्या त्यांना बरोबर." सैनिक म्हणाला, "पण लौकर चला." ते गाडीतून निघाले. तेजूने विचारले, "राजवाडा कसा असेल? "मी काय सांगू?" हलवा म्हणाला. "मी कोठे पाहिला आहे? पण नोकर-चाकर खूप असतील. आपल्याला जेवण वाढायला चार-पाच नोकर तरी असतीलच."

"मी तुमच्या बरोबर राहीन. मला काही कळत नाही. तुम्ही सांगाल तसं करीन."

थोड्या वेळाने ते राजवाड्यात आले. सरदाराने त्यांचे स्वागत केले. त्यांना आपल्याजवळ भोजनास बसविले. जेवण वाढण्यात आले.

सरदाराच्या नोकरांनीच पैसे चोरले होते. त्यांनी संगनमत करून

चोरी केली होती व पैसे बागेत पुरून ठेवले होते. सवडीने ते पैशांची वाटणी करणार होते. घोडागाडीचा ड्रायव्हरही त्यात सामील होता. त्याने एका साथीदाराला सांगितले की, "डॉ. सर्वज्ञ फार हुशार आहे. चोरीचा शोध लावण्यासाठी मालकानं त्याला बोलावलं आहे." हे ऐकून सर्वजण हादरले.

भोजनास सुरवात झाली. एक वाढपी सर्वांसाठी मसालेभात घेऊन आला. हलवा तेजूला म्हणाला, "मी सांगत नव्हतो. हा त्यांपैकी एक असावा." त्या नोकराला वाटले की 'तो पहिला चोर असावा' असे त्याने सांगितले. तो घाबरला. त्याने इतरांना डॉ. सर्वज्ञने त्याला ओळखल्याचे सांगितले. मग दुसरा नोकर भीतभीत आत आला व तूप वाढू लागला. तेव्हा हलवा म्हणाला, "हा दुसरा दिसतोय." हे ऐकताच तो नोकर बाहेर पळाला व त्याने इतरांना ही गोष्ट सांगितली. मग तिसरा नोकर आत जाण्यास धजेना. तो भीतभीत आत आला. त्याला पाहताच हलवा म्हणाला, "हा तिसरा." मग एक चौथा नोकर एक नवा पदार्थ बशीमध्ये झाकून घेऊन आला व त्याने ती मोठी बशी झाकलेलीच टेबलावर ठेवली. एवढ्यात सरदार म्हणाला, "आपण सर्वज्ञ आहात. या बशीत कोणता पदार्थ आहे सांगा बरे?" हलवा मनातून घाबरला. त्याला काय उत्तर द्यावे सुचेना. तो तेजूला म्हणाला, "आता हा हलवा संपला." सरदाराने बशीवरील झाकण काढले. आत गाजर हलवा होता. सरदार म्हणाला, "अभिनंदन! तुम्ही बरोबर ओळखलंत. आता मला खात्री वाटते, तुम्ही चोरीचाही तपास लावाल." चौथा नोकर परत स्वयंपाकगृहात गेला व त्याने ही हकिकत सर्वांना सांगितली. सर्वजण घाबरले. त्यांनी विचार केला की, 'डॉ. सर्वज्ञ सर्व जाणतात. आपण गुप्तपणे त्यांच्याशी बोलणे केले पाहिजे म्हणजे ते आपल्याला वाचवतील." त्यांनी भोजन संपवून हलवा हात धुवायला बाहेर येताच त्याला गाठले व सांगितले की, "जर तुम्ही आमची नावं सांगणार नसाल तर आम्ही तुम्हाला पैसे पुरून ठेवलेली जागा दाखवितो व शिवाय निराळे बक्षीसही देतो." हलवाने ते मान्य केले.

थोड्या वेळाने हलवाने सरदाराला सांगितले की चोरांची नावे त्याला

सांगता येणार नाहीत कारण नावे त्याला माहीत नाहीत. पण त्यांचे सर्व पैसे त्यांना परत मिळतील.

हलवाने सरदारांना बागेत नेले व पैसे पुरून ठेवलेली जागा दाखविली. सरदारांना सर्व पैसे परत मिळाले.

सरदाराने हलवाला मोठे बक्षीस दिले व घोडागाडीत बसवून परत पाठविले.

घोडागाडीच्या ड्रायव्हरने हलवाला गुप्तपणे नोकरांतर्फे मोठे बक्षीस दिले.

ती दोघं सुखाने राहू लागली.

---

## चांदीचा रुपाया

मोहन नावाचा एक तरुण सैनिक लढाईनंतर घरी परत चालला होता. तो आपल्या आईबाबांना व भावाबहिणींना भेटायला उत्सुक होता. घरी पोचल्यावर त्याला कळले की त्याचे आईबाबा निधन पावले आहेत आणि भावांनी सर्व इस्टेट वाटून घेतली आहे. त्याने मोठ्या भावाला "मला काही ठेवलं आहे काय?" असे विचारले.

भाऊ म्हणाला, "तुझी खुशाली कळली नव्हती. त्यामुळे आम्हाला वाटले की तू लढाईत मारला गेलास. म्हणून तुला काही दिले नाही. फक्त हा एक चांदीचा रुपया तुझी आठवण म्हणून बाजूला काढून ठेवला आहे, तो तू घे."

मोहनला फार दुःख झाले. तो रुपया खिशात टाकून तो पुन्हा घर सोडून निघाला. तो खूप चालला. त्याने अनेक डोंगरदऱ्या-जंगले पार केली. एका जंगलातून बाहेर पडताना त्याला एक फाटके कपडे घातलेला म्हातारा भेटला. म्हाताऱ्याने त्याच्याजवळ भीक मागितली. मोहनने खिशातून तो चांदीचा रुपया काढला व त्याला दिला. "माझ्याजवळ हा रुपया आहे. तो तू घे." मोहन म्हाताऱ्याला म्हणाला.

२४९३ दिनांक २५/७/८०
बापो



म्हातारा एकदम अदृश्य झाला. तेथे एक भरजरी पोषाख केलेला राजा निर्माण झाला आणि म्हणाला, "मी या जंगलचा जादूगार आहे. जो चांगला वागतो त्याचं मी भलं करतो. तू माझ्याशी चांगला वागलास. तू काहीही माग. तुझी इच्छा पूर्ण होईल."

मोहनने विचार केला व म्हटले, "मला वाटतं की मी इच्छा करीन तेव्हा मला ससा, कबूतर व मासा यांचं रूप घेता यावं." "तुझी इच्छा पूर्ण होईल. मी जातो. माझी आठवण ठेव." राजा अदृश्य झाला.

मोहन पुढे निघाला. त्याला एक मैदान लागले. त्याने ससा होऊन पाहिले. तो पुढे गेला आणि एका घनदाट झाडीत आला. त्याने कबूतराचे रूप घेतले आणि झाडीतून फिरला. पुढे त्याला एक नदी लागली. तो मासा झाला व नदीत फिरला. नंतर परत मोहन होऊन

संध्याकाळी एका मोठ्या शहरास पोचला.

त्या शहराच्या मोठ्या चौकात सैन्यभरतीचे काम चालू होते. राज्यावर संकट आले होते. राजाला नवीन सैनिकांची जरूर होती. मोहन तरुण, देखणा व हुषार होता. त्याने पुन्हा सैन्यात भरती होण्याचे ठरविले. त्याला सैन्यात भरती करून घेण्यात आले आणि राजाचा अंगरक्षक म्हणून नेमणूक मिळाली. कारण तो अनुभवी सैनिक होता.

लढाई सुरू झाली. त्याचे सहकारी सैनिक म्हणाले, "आमचा राजा नेहमीच विजयी होतो. राजाच्या बोटात एक जादूची अंगठी आहे ती त्याला विजय मिळवून देते."

एक दिवस घनघोर लढाई चालली होती. शत्रू प्रबळ होता. राजाचा पराभव होईल असे वाटत होते. राजाने आपली बोटे पाहिली. तो ती जादूची अंगठी घरी विसरून आला होता. राजाने ताबडतोब घोषणा केली, "जो सैनिक राजधानीला जाऊन राजवाड्यातून माझी अंगठी घेऊन येईल त्याच्याशी मी राजकन्येचं लग्न करीन." राजधानी दूर होती व तेथे जाऊन अंगठी त्वरित आणणे सोपे काम नव्हते. सैनिक म्हणाले, "अंगठी आणणं कठीण काम आहे. आम्ही जोरदार लढाई करतो."

पण मोहन राजाजवळ जाऊन म्हणाला, "महाराज, मी ती अंगठी जलद घेऊन येतो." राजाने त्याला परवानगी दिली. एका क्षणात तो ससा होऊन धूम पळाला. एका दुष्ट सैनिकाने हा प्रकार पाहिला. त्याने सशाला एक दगड मारला, पण तो दगड सशाला लागला नाही.

ससा अनेक मैदाने पार करून गेला. पुढे डोंगर व झाडी लागली. तो कबूतर बनून पुढे गेला व राजधानीला पोचला. त्याला राजवाड्याच्या खिडकीत बसलेली सुंदर राजकन्या दिसली. तिलाही ते सुंदर कबुतर दिसले. ती म्हणाली, "ये, मी तुला थोडे दूध व साखर देते." एवढ्यात मोहन प्रगट झाला व मुजरा करून त्याने सर्व हकिकत राजकन्येला सांगितली. तिने तिजोरीतून अंगठी आणून त्याला दिली. ती म्हणाली, "तू विजयी होऊन परत ये. मग आपण लग्न करू.पण शत्रूपासून सावध राहा." मोहन म्हणाला, "मी तुला तीन खुणेच्या वस्तू देतो. त्या तू नीट जपून ठेव." असं म्हणून तो कबूतर झाला व त्याने तिला आपल्या दोन्ही

पंखांतून एकेक पीस काढून दिले. मासा होऊन आठ रुपेरी खवले काढून दिले. नंतर ससा होऊन शेपटीचा एक बारीक तुकडा दिला. राजकन्येने त्या तिन्ही वस्तू एका सोन्याच्या डबीत ठेवल्या.

मग मोहन झपाट्याने राजाकडे परत आला. त्या दुष्ट सैनिकाचे त्याच्यावर लक्ष होतेच. त्याने ससा दिसताच त्याला गोळी मारली. ससा ठार झाला. त्या सैनिकाने सशाच्या तोंडातून अंगठी काढून घेतली व तो पळत पळत राजाकडे गेला. त्याने राजाला अंगठी दिली. राजा खूष झाला व म्हणाला, "राजकन्येशी तुझे लग्न करीन."

राजाने अंगठी घातली आणि शत्रूवर जोरदार हल्ला केला. राजा विजयी झाला व राजधानीला परत आला. राजकन्या त्याच्या स्वागताला धावली, पण तिला मोहन कुठे दिसला नाही. तिला आश्चर्य वाटले. राजाने दुसऱ्याच एका सैनिकाला तिच्यापुढे केले व म्हणाला, "याने मला अंगठी आणून दिली व मी लढाई जिंकली. मी तुझं याच्याशी लग्न लावून देणार आहे. उद्या आपण मोठी लग्नाची मेजवानी करू."

राजकन्या फार दुःखित झाली व रडत रडत राजवाड्यात गेली. ती दिवसरात्र रडू लागली. तिने अन्नपाणी सोडले. ती फार आजारी झाली. लग्न लांबवावे लागले. राजाला काळजी वाटू लागली. त्याने अनेक डॉक्टर बोलाविले पण राजकन्या डॉक्टरांशी बोलली नाही. डॉक्टर म्हणाले, "महाराज, आम्हाला तिच्या आजाराचं निदान होत नाही. ती काहीच सांगत नाही. औषध घेत नाही. आम्हाला करण्यासारखं काही नाही."

तिकडे मैदानात तो ससा तसाच मरून पडला होता. जंगलच्या जादूगार राजाला त्याची आठवण होती. त्याने आपल्या आरशात पाहिले. त्याला मेलेला ससा दिसला. तो वाऱ्याच्या वेगाने तेथे आला. त्याने सशाच्या नाकात फुंकर मारली. ससा जिवंत झाला. मोहन पुन्हा प्रगट झाला. तो घाईघाईने प्रवास करीत राजधानीला आला. कबूतर होऊन खिडकीतून राजकन्येच्या महालात आला. पुन्हा मोहनचे रूप घेऊन राजकन्येजवळ गेला व म्हणाला, "मी आलो आहे. काळजी करू नकोस." राजकन्येने त्याला ओळखले. तिला फार आनंद झाला व बरे

वाटू लागले.

मोहन राजाकडे गेला व त्याने राजाला सर्व हकिकत सांगितली. राजाने त्याला ओळखले नाही. राजा म्हणाला, "तू तोतया दिसतोस. तुझं म्हणणं खरं आहे हे मला पटवून दे, नाहीतर तुला फाशी जावं लागेल." मोहन म्हणाला, "तुम्ही राजकन्येला विचारा. तीच तुम्हाला खरा प्रकार सांगेल व तोतया कोण ते तुम्हाला समजेल."

राजाने मोहनकडे निरखून पाहिले व त्याला आठवले की यानेच अंगठी आणण्याचे मान्य केले होते."ठीक आहे" राजा म्हणाला व मोहनला घेऊन राजकन्येच्या महालात गेला व तिला म्हणाला, "मुली, वर बघ." तिने एकदम वर पाहिले. ती उठली व धावत राजाजवळ जाऊन म्हणाली, "बाबा, मी यालाच अंगठी दिली होती." राजा म्हणाला, "आश्चर्य आहे. पण मला अंगठी देणारा सैनिक दुसरा होता. आता काय करावं?" राजकन्या म्हणाली, "बाबा, थांबा. मी पुरावा देते. मगच तुम्ही न्याय करा." तिने सोन्याची डबी आणली व खुणेच्या वस्तू बाहेर काढल्या. राजकन्या खुर्चीत बसली. राजा लक्षपूर्वक पाहत होता. राजकन्या म्हणाली, "मोहनला निरनिराळी रूपं घेता येतात. तो कबूतर, ससा व मासा होऊ शकतो. मोहन, तू ती रूपं घेऊन दाखव." मोहन प्रथम कबूतर झाला. त्याच्या दोन्ही पंखांत एकएक पीस कमी होते. राजकन्येने ती दोन पिसे डबीतून काढून पंखात बसविली. मग मोहन मासा झाला. त्या माशाला आठ खवले कमी होते. राजकन्येने आठ रुपेरी खवले काढले व त्या ठिकाणी बसविले. मग मोहन ससा झाला. त्याच्या शेपटाचा तुकडा राजकन्येने दिला. तो बरोबर जुळला. मग मोहनने पुन्हा स्वतःचे रूप घेतले व म्हणाला, "त्या दुष्ट सैनिकानं मी सशाचं रूप घेऊन तुमच्याजवळ येत असता मला गोळी मारली आणि माझ्या तोंडातील अंगठी पळविली."

राजाची खात्री झाली. राजाने त्या दुष्ट सैनिकाला हद्दपार केले. राजकन्येचा व मोहनचा थाटात विवाह झाला. राजाने जिंकून घेतलेले नवीन राज्य त्याला दिले.

मोहन व राजकन्या यांनी तेथे अनेक वर्षे सुखाने राज्य केले.

## लोहार राजा

एक राजा होता. तो खूप श्रीमंत, शूर व लोकांचा आवडता होता. पण त्याला दोन मोठी दुःखे होती. त्याची एकुलती एक सुंदर मुलगी नेहमी खिन्न असे, हे राजाचे पहिले दुःख. राजाजवळ एक उमदा पांढरा शुभ्र घोडा होता. पण त्याला नाल मारणे कोणाला जमत नव्हते. घोडा इतका घाबरायचा की लोहारांना त्याला नाल बसविता येत नसे. त्यामुळे राजाने जाहीर दवंडी फिरविली की जो कोणी राजकन्येला हसवील व त्याच्या आवडत्या घोड्याला नाल बसवील त्याला राजकन्या दिली जाईल व राजाचा वारस करण्यात येईल.

खूप जणांनी यासाठी प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. त्या राज्यातील एका शहरात एक तरुण लोहार राहात होता. तो श्रीमंत नव्हता, पण देखणा, हुशार व शूर होता. त्याने प्रयत्न करायचे ठरविले. तो त्याच्या आईला म्हणाला, "आई, मी राजधानीला जातो आणि राजाची दोन्ही दुःखं नाहीशी करतो. मी राजाचा जावई होईन व त्याच्या राज्याचा वारस होईन."

त्याने जवळचे सर्व पैसे मोजले. त्याच्याजवळ शंभर चांदीची नाणी व पन्नास सोन्याची नाणी होती. ती त्याने तापवून वितळली. चांदीचे चार नाल बनविले व सोन्याचे प्रत्येक नालाला सात असे चार नालांसाठी अठ्ठावीस खिळे बनविले. एका पिशवीत त्याने त्याची हत्यारे, बनविलेले चांदीचे नाल व सोन्याचे खिळे घेतले. खाण्याचा डबा पिशवीत टाकला व पिशवी खांद्यावर टाकून भल्या पहाटे राजधानीला निघाला. वाटेत त्याला एक कीटक भेटला. कीटकाने विचारले, "तू कोठे निघालास?" तो म्हणाला, "मी राजाकडे चाललो. मी राजकन्येला हसविणार व राजाच्या घोड्याला नाल बसविणार." कीटक म्हणाला, "मला बरोबर घेऊन जा. तुला माझा उपयोग होईल." लोहाराने ते मान्य

केले व कीटकाला हनुवटीवर बसावयास सांगितले. तो त्याला घेऊन पुढे निघाला. त्याला एक उंदीर भेटला. उंदराने त्याची चौकशी केली व तोही त्याच्याबरोबर त्याच्या खांद्यावर बसून निघाला.

वाटेत तो एका हॉटेलात उतरला. तेथे त्याला एक 'ऊ' भेटली. तीही त्याच्या मानेवर बसून त्याच्याबरोबर निघाली. लोहार राजवाड्यावर पोचला. मुख्य दरवाजावर सैनिकांनी त्याला विचारले, "काय पाहिजे?" तो म्हणाला, "मला राजेसाहेब व राजकन्या यांना भेटायचे आहे." सैनिक म्हणाले, "राजे व राजकन्या इकडेच येत आहेत. त्यांना भेटा." लोहाराने राजाला वंदन केले व तो म्हणाला, "महाराज, मी राजकन्येला हसविण्यासाठी व आपल्या घोड्याला नाल बसविण्यासाठी आलो आहे." त्याच्या हनुवटीवर कीटक बसला होता, खांद्यावर उंदीर होता व मानेवरची 'ऊ' हळूहळू नाकाच्या शेंड्यावर आली होती. त्याचा तो अवतार पाहून राजकन्या जोरात हसू लागली व तिचे हसू थांबेना. लोहार म्हणाला, "महाराज, राजकन्या हसत आहे. म्हणजे तुमचं एक काम पूर्ण झालंच आहे." राजा म्हणाला, "बरोबर आहे. आता घोड्याला नाल बसव." राजा, राजकन्या व लोहार तबेल्यात गेले. त्याने पिशवीतून चांदीचे नाल व सोन्याचे खिळे काढले. ते पाहून राजा आश्चर्यचकित झाला. पण घोडा लोहाराला पाहून घाबरला. तो मागे मागे सरकू लागला व जोराने खिंकाळू लागला. लोहाराने कीटकाला खूण केली. कीटक घोड्याच्या कानांत जाऊन किरकिर करू लागला. घोड्याला ऐकू येईना. तो चूपचाप उभा राहिला. एवढ्यात उंदीर घोड्याच्या नाकात शेपटी घालून ती हलवू लागला. घोडा आणखी थंड झाला. लोहाराने याचा फायदा करून घेतला. त्याने घोड्याचा एकएक पाय वर उचलून त्यावर चांदीचा नाल ठेवून सोन्याचे खिळे मारले व तो घोड्यावर बसला. घोडा धीरे धीरे ताठ उभा राहिला. लोहार म्हणाला, "महाराज, आपले दुसरे कामही मी पूर्ण केले आहे. आता मी तुमचा जावई होऊ शकतो."

राजा खूष झाला व म्हणाला, "तरुण माणसा, तू छान काम केलंस. तुला मी माझी मुलगी देतो. माझ्यानंतर तूच या देशाचा राजा होशील."

लोहाराचा राजकन्येशी थाटात विवाह झाला. मोठी मेजवानी झाली.

मोठमोठे राजेरजवाडे मेजवानीला हजर होते. राजकन्या खूष झाली. लोहाराच्या आनंदाला पारावार राहिला नाही.

---

## वनपरी

जंगलात एका झोपडीत एक गरीब विधवा स्त्री व तिची मुलगी बानू राहात होत्या. त्यांच्याकडे दोन बकऱ्या व झोपडीजवळ एक लहानसे शेत होते. त्या शेतात त्या अंबाडी पिकवीत. बकऱ्या दूध व चीज देत. अंबाडीच्या दोऱ्या विणून त्या विकीत व आपली कशीबशी गुजराण करीत.

बानूला नाचगाण्याची फार आवड होती. ती रोज सकाळी आपल्या बकऱ्यांना घेऊन रानात जायची. तिच्याजवळ एका टोपलीत ती जेवणाचा डबा, थोडी पिंजलेली अंबाडी व सूत काढण्याची चकती ठेवायची. ती गाणं गात गात जायची आणि पाठोपाठ तिच्या बकऱ्या यायच्या. रानात पोचल्यावर ती एखाद्या झाडाखाली किंवा मोठ्या दगडावर बसून सूत कातायची. बकऱ्या आजूबाजूला चरायच्या. तोंडाने तिचे गाणे चालू असायचे. बकऱ्यांनाही तिचे गाणे आवडायचे. बकऱ्या चांगल्या धष्टपुष्ट झाल्या होत्या. सूर्य डोक्यावर आल्यावर ती जेवण करायची आणि थोडा वेळ नाचायची. नंतर संध्याकाळपर्यंत सूत काढीत बसायची व सूर्यास्ताला घरी परत जायची.

असे बरेच दिवस चालले होते. मग एके दिवशी दुपारी तिचे जेवण झाल्यावर तिच्यासमोर एकाएकी एक वनपरी प्रगट झाली. ती वनपरी फार सुंदर होती. तिने हिरवागार रेशमी झगा घातला होता. तिचे केस सोनेरी व लांब होते. केसांत तिने सुंदर सुंदर फुले माळली होती. बानूला ती परी म्हणाली, “बाळ, तुला नाचायला आवडते?” “हो” बानू म्हणाली, “मला नाच खूप आवडतो.” वनपरी म्हणाली, “मग आपण दोघी नाचू या. पक्ष्यांनो, गाणं गा. ताल धरा. आम्ही दोघी नाच करतो.”

निरनिराळे रंगीबेरंगी पक्षी त्या झाडावर जमा झाले आणि ताल धरून गाऊ लागले. त्या दोघी नाचू लागल्या. सूर्यास्तापर्यंत त्या नाचत होत्या. मग वनपरी अदृश्य झाली.

वनपरीबरोबर नाच करण्याच्या नादात बानूचे सूत कातणे राहून गेले. ती तशीच घरी गेली. तिला वाईट वाटले. तिने मनाशी ठरविले की, दुसऱ्या दिवशी जास्त सूत कातायचे. आई रागावेल म्हणून ती आईशी काहीच बोलली नाही.

दुसऱ्या दिवशी रानात दुपारी जेवण झाल्यावर तिने नाच न करता सूत कातायला सुरवात केली. एवढ्यात ती वनपरी पुन्हा आली व तिने बानूला नाचायचा आग्रह चालविला. बानू गप्प होती. फार आग्रह झाल्यावर बानू म्हणाली, "जर मी तुझ्याबरोबर नाचले तर माझं सूत कातणं राहून जाईल व आई मला रागावेल. आज जास्त सूत काढून मी कालची तूट भरून काढणार आहे."

"तू काही काळजी करू नको." वनपरी म्हणाली, "सर्व ठीक होईल." मग दोघी खूप वेळ नाचल्या. सूर्यास्ताला बानू रडत म्हणाली, "आज मी सूत कातलं नाही." वनपरीने तिची सर्व अंबाडी घेतली व क्षणात सर्व सूत कातून दिले. बानू खूष झाली. वनपरी अदृश्य झाली. बानू घरी आली. तिची आई रागाने म्हणाली, "बानू, काल तू फारच थोडं सूत कातलंस." बानूने उत्तर दिले,

"पण आज मी त्याची भरपाई गेली आहे." आई खूष झाली व बकऱ्यांचे दूध काढायला निघून गेली.

दुसऱ्या दिवशीही वनपरी पुन्हा आली व त्या दोघींनी पक्ष्यांच्या गाण्याच्या तालावर नाच केला. संध्याकाळी परीने सूत कातले व बानूच्या टोपलीत ठेवले. वनपरीने टोपलीचे झाकण लावले व बानूला बजावले, "बानू, घरी जाईपर्यंत तू टोपलीचं झाकण काढून पाहू नकोस."

बानू घरी आली. आई म्हणाली, "तू काल फारच छान सूत कातलंस." मग बानूने आईला वनपरीची सर्व हकिकत सांगितली. आई म्हणाली, "ती वनपरी असावी. तू भाग्यवान आहेस. वनपरी क्वचितच दिसते."

मग त्यांनी टोपलीचे झाकण काढून बघितले. टोपली सोन्याच्या पानांनी भरली होती. त्या दोघी फार खूष झाल्या.



त्यांनी ती सोन्याची पाने विकली. त्यांना खूप पैसे मिळाले. त्या श्रीमंत झाल्या. त्यांनी नवीन मोठे घर बांधले. मोठी शेतजमीन व बागाईत घेतली. बकऱ्या, मेंढ्या, डुकरे, कोंबड्या, गाई विकत घेतल्या. त्या आनंदात राहू लागल्या.

बानूला ती वनपरी पुन्हा कधी दिसली नाही.

---

## चार भाऊ

एका शिकाऱ्याला चार हुशार मुलगे होते. धाकटा मुलगा सोळा वर्षांचा झाल्यावर ते चारही भाऊ वडिलांना म्हणाले, "बाबा, आम्ही आता जगात जाऊन निरनिराळ्या व्यवसायांचे शिक्षण घेऊन येतो.

शिकून परत आल्यावर आपणा सर्वांना सुखात राहता येईल."

शिकारी खूष झाला व म्हणाला,"जरूर जा. माझे तुम्हाला आशीर्वाद आहेत. मी तुम्हाला खर्चासाठी पैसे देतो." मग त्याने प्रत्येकाला एक चांगला घोडा व दोनशे रुपये दिले.

बाबांचे आभार मानून व आशीर्वाद घेऊन ते घोड्यावर बसून निघाले. गावाबाहेर पडल्यावर ते निरनिराळ्या रस्त्यांनी जाणार होते. मोठा भाऊ म्हणाला, "आपण आता भिन्न रस्त्यांनी जाणार तर एकमेकांचा निरोप घेऊ या. बरोबर एक वर्षानं आपण घरी परत येऊ." सर्वांनी ते मान्य केले आणि स्वतंत्रपणे प्रवासाला निघाले.

एक वर्ष संपताच मोठा मुलगा परत आला व बाबांना प्रेमाने भेटला. वडिलांनी विचारले, "तू कोणतं काम शिकून आलास?"

तो म्हणाला, "मी मोची काम शिकून आलो."

वडील म्हणाले, "छान, जोड्यांना सारखी दुरुस्ती करावी लागते."

मोठा मुलगा म्हणाला, "मी नुसतं जोडे दुरुस्त करणं नाही शिकलो, तर मी काहीही दुरुस्त करू शकतो. मी नुसतं 'दुरुस्त हो' म्हटले की ती वस्तू नव्यासारखी होते."

थोड्या वेळाने दुसरा मुलगा आला. शिकाऱ्याने विचारले, "तू कोणतं काम शिकलास?"

तो म्हणाला, "मी चांगली चोरी करायला शिकलो."

"मला तुझी लाज वाटते." शिकारी म्हणाला, "तू असला घाणेरडा धंदा कशाला शिकलास?"

"बाबा, मी चोऱ्या करीत नाही." तो म्हणाला, "मी लोकांच्या खिशातून पैसे चोरीत नाही किंवा त्यांच्या कोंबड्या पळवीत नाही. मी कोणत्याही गोष्टीची इच्छा केली की ती माझ्याकडे आपोआप येते. तुम्ही जरा इकडे खिडकीजवळ या. तुम्हाला बाहेर मैदानात तो ससा दिसतो ना? आता नुसतं म्हणतो 'तो ससा इकडे येऊ दे.' तो पहा, तो ससा आपल्या या खोलीत आला. मी 'सशाला जाऊ दे' म्हणतो. पहा, तो निघून गेला."

एवढ्यात तिसरा मुलगा आला. तो म्हणाला, "मी आकाशातल्या

ताऱ्यांचं निरीक्षण करायला शिकलो. मी तारे पाहून या जगातील कोणतीही वस्तू पाहू शकतो. हरवलेली वस्तू कोठे आहे ते मी सांगू शकतो."

त्यांचे बोलणे चालू असतानाच धाकटा मुलगा आला. शिकाऱ्याने विचारले, "तू कोणता व्यवसाय शिकलास?"

तो म्हणाला, "मी शिकारी होण्याचं शिक्षण घेतलं."

शिकारी म्हणाला, "छान. तू माझाच धंदा पुढे चालविणार असं दिसतं."

तो म्हणाला, "पण माझी शिकारीची पद्धत तुमच्याहून निराळी आहे. मी नुसतं 'गोळी मार' म्हटलं की गोळी लागते. प्रत्यक्ष मारावी लागत नाही."

शिकारी म्हणाला, "ठीक आहे. आता अंधार पडायची वेळ झाली. पण तो ससा अजून मैदानात दिसत आहे. त्याची शिकार कर."

धाकटा मुलगा म्हणाला, "सशाला गोळी मार." ताबडतोब ससा मरून पडला.

"तो कोठे आहे?" शिकाऱ्याने विचारले, "मला दिसत नाही."

तिसऱ्या मुलाने आकाशातील तारे पाहून ससा झुडुपाआड असल्याचे सांगितले. दुसऱ्या मुलाने इच्छा करताच तो ससा त्याच्याजवळ आला. पहिला मुलगा म्हणाला, "सशाची लोकर खराब झालेली दिसते. ती आपल्याला विकता येणार नाही." त्याने इच्छा प्रदर्शित करताच ती लोकर नव्यासारखी झाली.

तो शिकारी व त्याचे चार मुलगे सुखाने राहू लागले. पुढे एक दिवस त्यांना समजले की त्या देशाच्या राजाची एकुलती एक राजकन्या हरवली आहे. त्यामुळे राजाराणी फार काळजीत आहेत. राजाने जाहीर केले की जो राजकन्येचा शोध लावील त्याच्याशी राजकन्येचे लग्न लावून देण्यात येईल.

चारही भाऊ राजाकडे आले आणि राजकन्येचा शोध लावण्याची कामगिरी त्यांनी स्वीकारली. संध्याकाळी आकाशात तारे दिसायला लागल्यावर तिसऱ्या भावाने तारे पाहून सांगितले की, "राजकन्या लाल

समुद्रातील एका बेटावर आहे. त्या बेटावर एक राक्षस राहतो. त्या राक्षसानं तिला पळवून तेथे बंदिवान करून ठेवलं आहे.'

दुसऱ्या दिवशी सकाळी ते चौघेजण राजाच्या एका वेगवान बोटीत बसून लाल समुद्रातील त्या बेटाच्या किनाऱ्याला पोचले. त्यांना बेटावर राजकन्या दिसली. दुसरा भाऊ म्हणाला, "राजकन्या येथे बोटीत येऊ दे." असं म्हणताच ती राजकन्या त्यांच्या बोटीत आली. त्यांनी बोट वळविली व ते वेगात परत येऊ लागले. राक्षसाने हे पाहिले व तो त्यांचा जोरात पाठलाग करू लागला. धाकटा भाऊ म्हणाला, "राक्षसाला गोळी मार" आणि राक्षस समुद्रात मरून पडला. पडता पडता राक्षसाची लाथ बोटीला लागली व बोटीला एक भोक पडले.

त्या भोकातून बोटीत पाणी येऊ लागले. मोठा भाऊ म्हणाला, "बोट दुरुस्त हो." तो असं म्हणताच बोटीचे भोक बंद झाले आणि बोट सुखरूप मायदेशी परत आली.

चार भाऊ व राजकन्या राजवाड्यात आली. राजकन्या राजाराणीला भेटली. सर्वांना खूप आनंद झाला.

राजाने चार भावांना राज्यातील चार मोठ्या विभागांचे प्रमुख नेमले.

राजकन्येचा विवाह तिसऱ्या भावाशी करून देण्यात आला. कारण त्यानेच तारे पाहून राजकन्या कोठे आहे याचा शोध लावला होता.

ते सर्वजण आनंदात राहू लागले.

---

## गरीब बापलेक

एक गरीब पण हुशार म्हातारा शेतमजूर होता. त्याला एकुलता एक मुलगा होता. मुलगा वीस वर्षांचा झाला व कामधंदा शोधण्यासाठी घर सोडून निघाला. बापाजवळ मुलाला देण्यासाठी पैसे नव्हते. फक्त जगाचा अनुभव होता. त्याने मुलाला काही उपदेशपर गोष्टी सांगितल्या. म्हातारा मुलाला म्हणाला, "बाळ, माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. पण

मी सांगतो ते नीट लक्षात ठेव. हुशार माणसाशी दोस्ती करू नकोस. नवीनच श्रीमंत झालेल्या माणसाकडून कर्ज घेऊ नको. कोणतीही गुप्त गोष्ट कोणालाच-तुझ्या बायकोला सुद्धा-सांगू नकोस. याप्रमाणे वागलास तर तुझं कल्याण होईल." मुलाने त्या गोष्टींचे नीट मनन केले.

मुलाने म्हाताऱ्याने सांगितलेल्या गोष्टीचा गंमत म्हणून वापर करून पाहिला. त्याने एका हुशार माणसाशी खोटी दोस्ती केली. एका नवीनच श्रीमंत झालेल्या माणसाकडून पैसे उसने घेतले व तो घरी आला.

एकदा त्याची बायको बाहेर गेली असता त्याने एक मेंढी मारली व मेंढीचे रक्त आपल्या कपड्यावर शिंपडले. बायको घरी आल्यावर त्याने तिला सांगितले की, "मी एका माणसाला मारलं, पण ही गोष्ट तू गुप्त ठेव. कोणाला सांगू नकोस." बायकोने ते मान्य केले.



काही दिवसांनी त्याचे बायकोशी कडाक्याचे भांडण झाले. त्याची बायको रागाने सरळ राजाकडे गेली व तिने राजाला सांगितले की,

“माझ्या नवऱ्याने एका माणसाला ठार मारले आहे.” राजाने त्या मुलाला पकडण्याचा हुकुम दिला. कोर्टात जाताना तो मुलगा आपल्या हुशार मित्राला भेटला व म्हणाला, “मी कोणा माणसाला ठार मारलं नाही. फक्त एका मेंढीला मारले आहे. हे तुला माहीत आहे. तू मला जामीन रहा.”

मित्राने उगीच भानगड नको म्हणून त्याला टाळले व म्हणाला, “मी फार कामात आहे. मला वेळ नाही.” नंतर तो कर्ज काढलेल्या श्रीमंत माणसाकडे गेला व त्याला त्याने सर्व हकिकत सांगितली. त्या श्रीमंत सावकाराने विचार केला की, ‘हा तुरुंगात गेला तर त्याने माझ्याकडून घेतलेलं कर्ज कसं वसूल होणार? सर्व पैसे बुडणार.’ त्याने ताबडतोब सर्व पैसे परत मागितले. एवढेच नव्हे, तर त्याच्याकडून वसूल केले.

शेवटी त्या मुलाला राजापुढे उभे करण्यात आले. त्याने राजाला वडिलांचा उपदेश सांगितला व त्या उपदेशाची परीक्षा पाहण्यासाठी केलेला उद्योगही सांगितला. त्याची हकिकत ऐकल्यानंतर राजाला त्या मुलाच्या बापाच्या शहाणपणाबद्दल कौतुक वाटले. त्याने मुलाला सोडून दिले, पण त्या म्हाताऱ्याचा उपदेश लक्षात ठेवला. पण राजाला त्या म्हाताऱ्याची व त्याच्या मुलाची भीती वाटली. तो स्वतःशी म्हणाला, “हे बापलेक फार हुशार आहेत. त्यांना माझ्यापेक्षा जास्त समजतं. उद्या ते माझं राज्यसुद्धा बळकावतील.” हा विचार मनात येताच राजाने त्या दोघांना नष्ट करण्याचे ठरविले व त्यांना जिवंत पुरण्याचा हुकुम दिला.

दुसऱ्याच दिवशी राजा आजारी झाला. त्याच्या घशात एक बारीक हाडाचा तुकडा चिकटून बसला होता. काही केल्या तो निघेना. अनेक डॉक्टरांनी प्रयत्न केले पण हाडुक बाहेर निघाले नाही. मग एका मंत्र्याने राजाला सुचविले की, “तुम्ही त्या म्हाताऱ्याला व त्याच्या मुलाला जिवंत पुरण्याची शिक्षा का दिली? त्यांनी तुम्हाला निश्चित वाचविले असते. ते अजून जिवंत असले तर प्रयत्न करून पाहावा.” राजाला मंत्र्याचे बोलणे पटले व तो म्हणाला, “ते कदाचित अजून जिवंत असतील. त्यांना बाहेर काढा व इकडे घेऊन या.”

ते दोघे खरोखरच अजून जिवंत होते. त्यांना पुरताना म्हाताऱ्याने एक बांबूची लांब पोकळ नळी जवळ ठेवली होती. त्या पोकळ काठीच्या मदतीने पुरल्यानंतरही त्यांचा श्वास चालू होता. त्यांना बाहेर काढण्यात आले. पण ते राजाकडे जायला तयार नव्हते. त्यांना राजाचा राग आला होता. ते म्हणाले, "आम्ही राजासाठी काही करणार नाही. त्याने आम्हाला उगाचच ही भयंकर शिक्षा दिली."

राजा उदास झाला. त्याला वाटले की आपण आता मरणार. त्याने पुन्हा पुन्हा त्या बापलेकांना निरोप पाठवून विनवणी केली. अर्धे राज्य देण्याचे कबूल केले. त्यांना जिवंत पुरल्याबद्दल त्यांची माफी मागितली.

अखेर ते दोघेजण राजाकडे जायला तयार झाले. ते राजवाड्यात आले. राजाने त्यांना त्याच्या घशात अडकलेले हाड काढण्याची विनंती केली.

म्हातारा म्हणाला, "महाराज, तुमचं दुखणं अवघड आहे त्यासाठी आपल्याला मोठी किंमत द्यावी लागेल. आपणास आपल्या मुलाला ठार मारावं लागेल." राजाला तसे करणे मान्य नव्हते. तो फार दुःखी झाला. पण सर्व मंत्र्यांनी राजाला आग्रह केला. शेवटी राजा तयार झाला.

त्याच्या मुलाला दोऱ्यांनी बांधण्यात आले. राजासमोर एक पडदा उभा करण्यात आला. राजाला पडद्यापलीकडचे काही दिसत नव्हते. म्हाताऱ्याने एक मोठा धारदार सुरा मागविला. पडद्यामागून आवाज ऐकू येऊ लागले. राजाला एक भयानक किंकाळी ऐकू आली. राजाला मोठा हुंदका आला व त्यानेही जोरात एक किंकाळी मारली. त्याबरोबर तो हाडाचा तुकडा राजाच्या तोंडातून बाहेर पडला.

म्हाताऱ्याने राजाला सांगितले की त्याने एक मेंढी मारली. राजपुत्र जिवंत आहे.

राजा खूष झाला. त्याने आपले अर्धे राज्य त्या म्हाताऱ्यास व त्याच्या मुलाला बक्षीस दिले.

ते आनंदात राहू लागले.

## जादूची डबी

एका नदीकाठी एक म्हातारा मासेमार राहत होता. त्याला एक मुलगा व तीन सुंदर मुली होत्या. म्हाताऱ्याचा मुलगा आपल्या बोटीतून मासेमारी करायचा.

एक दिवस त्यांच्याकडे तीन प्रवासी आले. ते तीन राजपुत्र होते. त्यांतील एक माशांचा राजा होता. दुसरा पक्ष्यांचा राजा होता. व तिसरा उंदरांचा राजा होता. शिकार करता करता संध्याकाळ झाल्यामुळे रात्रीच्या मुक्कामासाठी ते आले होते. त्यांनी त्या तीन सुंदर बहिणी पहिल्या व त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी म्हाताऱ्याजवळ मागणी घातली. काही दिवसांनी त्यांची लग्ने झाली व ते आपापल्या बायका घेऊन परत जाण्यास निघाले. जाताना त्यांनी मासेमाराला नजराणे दिले. पहिल्या दोघांनी सोन्याच्या मोहरांनी भरलेल्या थैल्या दिल्या, तर तिसऱ्या राजपुत्राने एक हस्तिदंती तपकीरीची डबी दिली. त्या मासेमार मुलाला वाटले की तो राजपुत्र आपली थट्टा करीत आहे. त्याने ती डबी आपल्या जाकिटाच्या खिशात ठेवून दिली.

बहिणी गेल्यावर त्या मुलाला उदास वाटले. काही दिवसांनी त्याचे बाबाही वारले. तो अधिक उदास झाला. त्याने प्रवासाला जाण्याचे ठरविले. त्याच्याजवळ भरपूर पैसे होते. त्याने खूप प्रवास केला. नवे कपडे केले व तो आपले दुःख विसरला. पण थोड्याच दिवसांत त्याचे पैसे संपत आले. तो परत आपल्या नदीकाठच्या खेडेगावातील घरी आला. त्याचे घर मोडकळीस आले होते. बोट खराब झाली होती. तो घरात गेला. त्याचे जाकीट खुंटीवर होते. त्याने जाकिटाचे खिसे पाहिले. खिशात पैसे नव्हते. पण एका खिशात ती हस्तिदंती डबी होती. तो ती टाकून देणार होता. पण त्याला वाटले, तिच्यात काहीतरी असावे. त्याने झाकण उघडले व डबीतून आवाज आला- "मालक, मी

तुमची काय सेवा करू?" "तू माझी काय सेवा करणार?" तो म्हणाला, "आता तरी मला चांगलं जेवण पाहिजे." आणि काय आश्चर्य, त्याच्या समोर एक टेबल आले. त्या टेबलावर अनेक खाद्यपेये होती. त्याने भरपूर जेवण केले.

त्या वेळी राज्यात सर्वत्र दुष्काळ होता. अन्नधान्याची चणचण होती. तेथील राजाने फर्मान काढले होते की, 'जो कोणी राजाला सर्व प्रजेला पुरेल इतके अन्न आणून देईल, त्याला राजा आपली एकुलती एक राजकन्या देईल.'

अनेक तरुणांनी राजवाड्यात गाड्या भरभरून धान्य पाठविण्यास सुरुवात केली. या छोट्या मासेमाराच्या कानांवर ही गोष्ट आली. त्याने त्या डबीच्या मदतीने राजाला मदत करण्याचे ठरविले. त्याने डबीचे झाकण उघडले. ताबडतोब आवाज आला. "मालक, मी काय सेवा करू?" तो म्हणाला, "मला हजारो गाड्या धान्य पाहिजे. इतके की दुसरा कोणी तेवढे राजाला देऊ शकणार नाही." ताबडतोब धान्याच्या हजारो गाड्या येऊ लागल्या. मासेमार त्या गाड्या घेऊन राजाकडे गेला. राजा खूष झाला. आठ दिवसांनी त्या मासेमाराचे राजकन्येशी थाटात लग्न झाले.

लग्नानंतर एक दिवस त्याने ती जादूची डबी उघडली व सांगितले की, "मला एक चांगला किल्ला राजाच्या राजवाड्याजवळच पाहिजे. त्या किल्ल्यातील राजवाडा सोन्याच्या साखळयांनी वर ढगाला लटकणारा पाहिजे." मागण्याचा अवकाश, किल्ला व राजवाडा तयार झाला. राजाने तो पाहिला. त्याला आश्चर्य वाटले. राजाने मोठी मेजवानी दिली, पण राजाच्या प्रधानाच्या मनात दुष्ट विचार होते. त्याला मासेमाराचा हेवा वाटत होता. त्याने त्या नव्या राजवाड्याचे बारकाईने निरीक्षण चालविले. एका कोनाड्यात त्याला ती जादूची डबी दिसली. त्याने कुतूहलाने ती उघडली व डबीतून नेहमीचा आवाज आला– "मालक, काय सेवा करू?" त्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "हा किल्ला व राजकन्या यांना घेऊन पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला चल." ताबडतोब किल्ला हवेत उडू लागला. अनेक पर्वत, नद्या, जंगले, मैदाने

व समुद्र पार करून तो पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला गेला. राजवाड्यात राजकन्या एकटीच प्रधानाजवळ होती. ती घाबरली.

मासेमार राजाबरोबर शिकारीला गेला होता. परत येताच त्याला किल्ला दिसेना. खिशात ती डबीही नव्हती. तो फारच दुःखी झाला. राजाही दुःखी झाला व त्याने राजकन्येला दोन महिन्यांत परत आणण्याचा मासेमाराला हुकुम दिला. मग मासेमाराने विचार सुरू केला. त्याला त्याच्या तीन बहिणींची व त्यांच्या नवऱ्यांची आठवण झाली. त्याने त्यांची मदत घेण्याचे ठरविले. प्रथम तो माशांच्या राजाकडे गेला. बहिणीला प्रेमाने भेटला. मग त्याने त्यांना सर्व हकिकत सांगितली. माशांच्या राजाने सर्वत्र चौकशी केली, पण काही माहिती मिळाली नाही. मग तो दुसऱ्या बहिणीकडे गेला. त्या पक्ष्यांच्या राजाने त्याला मदतीचे आश्वासन दिले. एका गरूड पक्ष्याने सांगितले की "मी असा सोन्याच्या साखळयांनी ढगाला लटकलेला किल्ला पाहिला आहे. तेथे एक आठवड्यानंतर त्या राजकन्येचे लग्न होणार आहे." पक्ष्यांच्या राजाने विचारले, "तू एक मनुष्य घेऊन तेथे जाऊ शकशील?"

"हो. पण तत्पूर्वी भरपूर खाऊन मला ताकद कमवायला पाहिजे. लांबचा प्रवास आहे."

गरुडाने त्या रात्री भरपूर खाऊन घेतले व दुसऱ्या दिवशी सकाळी मासेमाराला पंखावर बसवून प्रवासाला निघाला. अनेक पर्वत, नद्या व महासागर पार करून तो किल्ल्याजवळ आला. मासेमार खाली उतरला व किल्ल्यात गेला. त्याला राजवाड्याच्या खिडकीत राजकन्या दिसली. त्याला पाहून ती खूष झाली व म्हणाली, "प्रधानानं मला फसवून येथे आणले. त्याचा माझ्याशी लग्न करायचा विचार आहे. त्याच्याजवळ ती जादूची डबी आहे व तो ती नेहमी जवळ ठेवतो. रात्री झोपताना डबी उशीखाली ठेवतो." मासेमार म्हणाला, "मी गरुडाला माझ्या तिसऱ्या बहिणीकडे पाठवितो. ती आपल्या नवऱ्याकडून-उंदरांच्या राजाकडून मला एक-दोन उंदीर पाठवील व त्यांच्या मदतीनं मी ती डबी हस्तगत करीन." त्याप्रमाणे पत्र देऊन त्याने गरुडाला बहिणीकडे पाठविले आणि काही तासांतच गरूड दोन लांब

शेपटीवाले उंदीर घेऊन परत आला.

रात्री मासेमार प्रधानाच्या पलंगाखाली उंदीर घेऊन लपून बसला. जरा वेळाने प्रधान घोरू लागला. मासेमार उंदराला म्हणाला, "तू आता तुझं काम कर." त्याने प्रधानाच्या तोंडात शेपटी घातली. पण त्याची शेपटी लहान होती. मग त्याने दुसऱ्या उंदराला पाठविले. त्याची शेपटी चांगली लांब होती. ती प्रधानाच्या घशापर्यंत गेली. प्रधान घाबरला व बेशुद्ध झाला. मासेमाराने चपळाई करून उशीखालची डबी ताब्यात घेतली.

मासेमाराने डबी उघडली व किल्ला परत पहिल्या जागी नेण्याची आज्ञा केली. किल्ला पहिल्या जागी येऊन स्थिर झाला. मग त्याने प्रधानाला हद्दपार करण्याचा हुकुम दिला.

सकाळी राजा उठून पाहतो तो जावयाचा किल्ला परत समोर उभा. तो घाईघाईने त्या किल्ल्यात गेला. त्याला राजकन्या आणि मासेमार भेटले. राजाला फार आनंद झाला. मोठ्या मेजवानीचा थाट करण्यात आला.


त्यापुढे मात्र मासेमार ती डबी आपल्या खिशात जपून ठेवू लागला.

---

## जादूचा केस

एक गरीब शेतमजूर होता. त्याला कोठे काम मिळेना. तो रोज निरनिराळ्या शेतांवर जाई व काम मागे. पण तो काळच असा विचित्र होता की त्याला कोणीच मदत करीना. तो, त्याची बायको आणि मुलांवर उपासमारीची पाळी आली.

एके रात्री त्या शेतमजुराला एक चमत्कारिक स्वप्न पडले. त्याला स्वप्नात एक सोनेरी पोशाख घातलेले एक सुंदर मूल दिसले व त्याला म्हणाले, "उद्या सकाळी तुझ्या उशीखाली तुला तीन गोष्टी मिळतील. एक छोटा आरसा. एक लाल स्कार्फ व भरतकाम केलेला एक सुंदर



हातरुमाल. या तिन्ही वस्तू तू तुझ्या खिशात ठेव व नदीवर जा. तेथून तू नदीच्या उगमाकडे जा. तेथे तुला एक रूपवान जलपरी दिसेल. ती तुझ्याजवळ बोलेल, पण तू एक अक्षर बोलू नकोस. नाहीतर ती तुला मासा करून खाऊन टाकील." नंतर त्या मुलाने पुढे काय काय करायचे ते त्या शेतमजुराला समजावून सांगितले.

सकाळी उठल्यावर त्याला त्या तीन वस्तू उशीखाली मिळाल्या. त्या त्याने गुपचूप आपल्या खिशात ठेवल्या. न्याहरी करून तो उजाडताच नदीवर गेला. नंतर तो डोंगर-टेकड्यांतून चालत चालत नदीच्या उगमापाशी गेला. तेथे त्याला खडकावर बसलेली सुंदर जलपरी दिसली. तिने हिरवा व सोनेरी रंगाचा झगा घातला होता. तिच्या सोनेरी केसांवर फुलांचा मुगुट होता.

जलपरी म्हणाली, "तुझे स्वागत असो. तू कोण आहेस? तुला काय पाहिजे?" शेतमजूर काहीच बोलला नाही. जलपरी बोलतच रा

पण स्वप्नात सांगितल्याप्रमाणे तो गप्पच राहिला.

मग जलपरी म्हणाली, "जर तू काही बोलला नाहीस तर तुला माझे केस विंचरावे लागतील." तिने त्याला एक हस्तिदंती कंगवा दिला. तो तिच्या पाठीमागे बसून त्या कंगव्याने तिचे सुंदर केस विंचरू लागला. केस विंचरताना त्या सोनेरी केसात त्याला एक लाल केस दिसला. त्याने तो हळूच काढून घेतला व गुंडाळी करून खिशात ठेवला.

जरा वेळाने शेतमजूर परत निघाला. जलपरी रागाने त्याचा पाठलाग करू लागली. ती त्याच्या जवळ आली.

स्वप्नातील मुलाने सांगितल्याप्रमाणे त्याने जवळचा हातरुमाल खाली टाकला. जलपरीने तो हातरुमाल उचलला. शेतमजूर पुढे पळत निघाला. जलपरीने पुन्हा त्याला गाठले. मग त्याने रेशमी स्कार्फ खाली टाकला. जलपरी थांबली. तिने तो स्कार्फ घेतला व डोक्याला बांधला. तोपर्यंत शेतमजूर बराच पुढे गेला होता. परत ती पाठलाग करीत त्याच्याजवळ आली. या वेळी त्याने आरसा खाली टाकला. जलपरीने आरसा उचलला. तिने पूर्वी कधी आरसा पाहिला नव्हता. आरसा पाहून तिला आश्चर्य व आनंद वाटला. ती आपले रूप आरशात पाहू लागली व त्यामध्ये तिचा बराच वेळ गेला. त्या काळात शेतमजूर खूप दूर निघून गेला. जलपरीने त्याचा नाद सोडून दिला. ती त्या तीन वस्तूंवर खूष होती.

शेतमजूर घरी आला. त्या जलपरीचा लाल केस त्याच्या जवळ होता. त्याने बायकोला सर्व हकिकत सांगितली. तिला ती सर्व गंमतच वाटली व त्यावर तिचा विश्वास बसला नाही.

त्या मुलाच्या सांगण्याप्रमाणे शेतमजुराने तो लाल केस बाजारात विकण्याचे ठरविले. तो बाजारात गेला व 'लाल केस विकायचा आहे' असे ओरडू लागला. लोकांना आश्चर्य वाटले व त्याच्याभोवती गर्दी झाली. "मी दहा पौंड देतो." एक व्यापारी म्हणाला. दुसऱ्याने तीस पौंड केले. केसाची किंमत वाढत वाढत शंभर पौंड झाली. राजाचा कारभारी बाजारात होता. त्याने तो केस पाहिला व त्याने ठरविले की हा केस

राजाला दाखवावा. तो शेतमजुराला राजाकडे घेऊन गेला. राजाने तो केस आपल्या मंत्र्यांना दाखविला. "हा जादूचा केस आहे" त्यांनी सांगितले. राजाने तो केस एक हजार पौंड देऊन विकत घेतला. त्या केसांवर निरनिराळी उपयुक्त माहिती सांकेतिक भाषेत लिहिली होती. शेतमजुराला याची काहीच कल्पना नव्हती.

शेतमजुराचे दारिद्र्य नष्ट झाले. तो, त्याची बायको व मुले आनंदात राहू लागली.

---

म. सं. सं., ठाणे,
२४९३ २५।५।७०
बावा

## लंबू, ढबू आणि तेजू

एकदा एक राजा आपल्या एकुलत्या एक राजपुत्राला म्हणाला, "आता तू मोठा झालास. तुझे लग्न करावयास पाहिजे. मी तुला बायको पाहण्यास मदत करतो. ही सोन्याची किल्ली घे. या किल्लीने राजवाड्याच्या पूर्वेकडील मनोऱ्यावरील खोलीचे दार उघड. तुला तुझी बायको मिळेल . ती मिळवण्यासाठी तुला मोठ्या संकटांतून जावे लागेल." त्याप्रमाणे राजपुत्र ती किल्ली घेऊन त्या उंच मनोऱ्यावरील खोलीशी गेला. त्याने किल्लीने दार उघडले. खोली गोलाकार, मोठी व सुंदर होती. जमिनीवर हिरवा गालिचा पसरला होता. वर निळे छत होते. खोलीला बारा उंच खिडक्या होत्या. प्रत्येक खिडकीच्या काचेवर सुंदर तरुणीचे मोठे चित्र होते. प्रत्येक चित्र एकापेक्षा अधिकाधिक सरस होते. बाराव्या खिडकीच्या काचेवर रेशमी पारदर्शक पडदा होता. त्या काचेवरील चित्र सर्वांत अप्रतिम होते. राजपुत्र मनाशी म्हणाला, "मी याच राजकन्येशी लग्न करणार." चित्रातील राजकन्या हसली व लाजली असा त्याला भास झाला.

एवढ्यात सर्व बारा चित्रे अदृश्य झाली. तो खोलीबाहेर आला व राजाकडे गेला. राजा म्हणाला, "तू बाराव्या खिडकीतील रेशमी पडद्यामागची राजकन्या पसंत केली असशील. तुझी निवड उत्तम आहे. पण ती राजकन्या एका दुष्ट जादूगाराने लोखंडी किल्ल्यात बंद करून ठेवली आहे. अनेक राजपुत्रांनी तिला मिळवण्याचे प्रयत्न केले. पण जादूगाराने त्यांचे दगडी पुतळे बनवून टाकले आहेत."

राजपुत्र म्हणाला, "मी प्रयत्न करतो. मला ती आवडली आहे. हा लोखंडी किल्ला कोठे आहे?"

"मला माहीत नाही." राजा म्हणाला. "खूप दूर आहे असं म्हणतात."

दुसऱ्या दिवशी राजपुत्र त्याच्या आवडत्या घोड्यावर बसून

निघाला. त्याने बरोबर खूप द्रव्य घेतले होते. तो वाटोवाट लोखंडी किल्ल्याची चौकशी करीत होता. पण तो कोठे आहे हे कोणालाच माहीत नव्हते. नंतर तो एक घनदाट जंगलात आला. तेथे त्याला आवाज आला- "महाराज, थांबा. मी आलो." त्याने आजूबाजूला पाहिले. त्याला एक उंच माणूस दिसला. तो माणूस म्हणाला, "महाराज, मला तुमच्याबरोबर न्या. माझा तुम्हांला उपयोग होईल."

राजपुत्राने विचारले, "तुझे नाव काय? तुला काय करता येते?" तो म्हणाला, "माझे नाव लंबू, मी वाटेल तेवढा लांब होऊ शकतो. तुम्हाला ते उंच झाडाच्या शेंड्याजवळील पक्ष्याचे घरटे दिसते ना ते मी तुम्हांला काढून देऊ शकतो." असं म्हणून लंबू झाडाइतका उंच उंच झाला व त्याने ते घरटे अलगद हातात घेतले. मग तो हळूहळू लहाने झाला व ते घरटे त्याने राजुपत्राला दिले. "तू हुशार दिसतोस." राजपुत्र म्हणाला. "तू मला जंगलातून बाहेर जाण्याचा रस्ता दाखवू शकतोस?" लंबू पुन्हा उंच उंच झाला व त्याने चारी बाजूला पाहिले व म्हणाला, "महाराज, मला जंगलातून बाहेर पडण्याचा जवळचा रस्ता दिसतो." मग राजपुत्राने त्याला बरोबर घेतले. लंबूने त्याला बाहेर पडण्याचा मार्ग दाखविला.

पुढे त्यांना प्रचंड मोठमोठे खडक लागले. लंबू म्हणाला, "महाराज, माझा एक मित्र आहे. त्याचे नाव ढबू. तो येथे जवळच राहतो. त्याचा आपल्याला उपयोग होईल." राजपुत्र म्हणाला, "बोलाव त्याला." लंबू पुन्हा खूप उंच उंच झाला व आपल्या लांब हाताने त्याने ढबूला उचलून आणले. राजपुत्राने ढबूला विचारले, "तू काय करू शकतोस?" ढबू म्हणाला, "मी वाटेल तितका लठ्ठ होऊ शकतो." असं म्हणून तो प्रचंड बलूनसारखा लठ्ठ झाला. त्याने संपूर्ण मैदान व्यापले. नंतर हवा सोडून तो बारीक झाला. वादळ आल्यासारखी झाडे हादरली. राजपुत्राने त्याला बरोबर घेतले.

मग ते तिघेजण निघाले. थोड्या वेळाने त्यांना त्यांचा आणखी एक मित्र भेटला. त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधली होती. राजपुत्राने विचारले, "तू कोण आहेस? तू डोळे का बांधले आहेस? तुला नीट दिसत नाही का?" तो म्हणाला, "पट्टी बांधून मला छान दिसते. पट्टी काढली तर खूप

लांबचे दिसते व मी ज्यावर सरळ दृष्टी टाकीन ते जळून जाते. माझे नाव तेजू." त्याने पट्टी बाजूला केली व एका दूरच्या खडकाकडे पाहिले. तो खडक जळून त्याचे भस्म झाले. त्या राखेत एक सोन्याचा गोळा होता. तो त्याने राजुपत्राला दिला.

"वा! छान. तूही आमच्याबरोबर चल." राजपुत्र म्हणाला, "तुला जर दूरचे दिसते तर लोखंडी किल्ला कोठे आहे ते सांग."

तेजूने पट्टी काढून पाहिले व तो म्हणाला, "तो लोखंडी किल्ला समोरच्या काळ्या खडकांच्या पलीकडे आहे."

"तुला त्या किल्ल्यात राजकन्या दिसते का?" राजपुत्राने विचारले.
"ती किल्ल्याच्या वरच्या मनोऱ्यात बंदिस्त आहे." तेजूने सांगितले.

राजपुत्र म्हणाला, "एका दुष्ट जादूगाराने तिला तेथे बंदीवान करून ठेवले आहे. तिला तेथून सोडवून मला तिच्याशी लग्न करायचे आहे. तुम्ही मला मदत करू शकाल का?"

"हो, आनंदाने आम्ही आपल्याला मदत करू." ते तिघेही म्हणाले. मग ते सर्व लोखंडी किल्ल्याकडे जायला निघाले. लंबू खूप उंच झाला व त्याने सर्वांना उचलून अलगद त्या किल्ल्यासमोर ठेवले.

किल्ल्याच्या मुख्य द्वाराजवळ घोड्यांचा मोठा तबेला दिसला. राजपुत्राने आपला घोडा तेथे ठेवला. नंतर ते मोठ्या हॉलमध्ये आले. तेथे खूप लोक होते पण ते सर्व दगडी पुतळे झाले होते. मग ते इतर खोल्यांतून गेले. तेथे आणखी दगडी पुतळे होते. एका मोठ्या खोलीत जेवणाचे मोठे टेबल होते. टेबलावर अनेक खाद्यपेये ओळीने मांडून ठेवली होती. त्यांना भूक लागलीच होती. त्या सर्वांनी भरपूर जेवण केले.

एवढ्यात दार उघडून जादूगार आत आला. त्याला लांब दाढी होती व त्याने काळा झगा घातला होता. त्याने कमरेला लोखंडी पट्टा घातला होता. त्याने एका हाताने राजकन्येला धरले होते. राजकन्या त्याने बाराव्या खिडकीत पाहिलेल्या चित्रासारखी सुंदर होती. तिने पांढरा शुभ्र झगा घातला होता. कमरेत सोन्याचा पट्टा होता व डोक्यावर मोत्यांचा मुकुट होता. ती खिन्न व उदास दिसत होती.

राजपुत्र तिला भेटण्यासाठी पुढे झाला. पण जादूगाराने त्याला

अडविले व तो म्हणाला, "मला माहीत आहे तू कशीसाठी आला आहेस. तुला राजकन्येला न्यावयाचे आहे. पण मी तिच्यावर मंत्र घातला आहे. जर तू तीन रात्री तिच्यावर नजर ठेवून बसू शकलास तर ती तुला मिळेल. जर हे तुला जमले नाही तर तू व तुझे तीन नोकर दगडाचे पुतळे व्हाल. तुमच्यापूर्वी आलेल्यांची तीच गत झाली आहे." त्याने राजकन्येला एक खुर्चीत बसवले व तो निघून गेला.

त्या खुर्चीत ती एखाद्या संगमरवरी पुतळ्यासारखी दिसत होती. राजपुत्र तिच्याशी बोलला, पण ती गप्पच होती. राजपुत्र व त्याचे तीन मित्र तिच्यावर पाळत करीत होते. पण काही वेळाने त्या सर्वांना झोपा लागल्या. प्रथम राजपुत्राला जाग आली. त्याने पाहिले पण राजकन्या नाहीशी झाली होती. तो ओरडला. ते तिघेजण जागे झाले. तेजू म्हणाला, "महाराज, घाबरू नका. मला राजकन्या दिसते . येथून शंभर मैलांवर एक अरण्य आहे. अरण्याच्या मध्यभागी एक वडाचे मोठे झाड आहे. त्या झाडावर राजकन्या बसली आहे." लंबू उठला व खूप उंच झाला. त्याने तेजूला खांद्यावर घेतले व काही सेकंदांत तो त्या वडाच्या झाडाजवळ पोचला. ते दोघे राजकन्येला घेऊन परत आले. एवढ्यात तो जादूगार आत आला. राजकन्येला पाहून तो चिडला. राजकन्येला तो घेऊन गेला. तो राजपुत्र व त्याचे मित्र यांनी सर्व किल्ला पाहून घेतला. जिकडेतिकडे दगडी पुतळे दिसत होते. तबेल्यातील घोडे दगडी पुतळे झाले होते. दुसऱ्या खोलीत एक नोकर ब्रेड तोंडात घालीत होता. पण तोही दगडी पुतळाच होता. नदीतील पाणी दगडी झाले होते. राजपुत्राला व त्याच्या मित्रांना भरपूर खायला-प्यायला मिळत होते.

दुसऱ्या रात्री जादूगाराने जेवणानंतर पुन्हा राजकन्येला त्या खुर्चीत आणून बसविले. राजपुत्रास तिच्यावर नजर ठेवण्यास सांगितले व तो निघून गेला. त्या रात्री सर्वांनी चांगला पहारा करण्याचे ठरविले. पण मध्यरात्रीनंतर त्यांना झोप लागली. राजपुत्राला जेव्हा जाग आली तेव्हा राजकन्या तेथे नव्हती. त्याने तेजूला उठविले. तेजूने खिडकीजवळ जाऊन पाहिले. राजकन्या तेथून दोनशे मैलांवरील एका खडकात हिऱ्याचा खडा बनून बसली होती. तेजूने लंबूला उठविले व ते दोघे

निघाले. तेजूने त्या खडकावर दृष्टी रोखताच त्याचे भस्म झाले व तो हिऱ्याचा खडा बाहेर पडला. तो घेऊन ते परत आले. राजकन्या परत आलेली पाहून जादूगार रागावला. तो तिला घेऊन गेला.

तिसऱ्या रात्री जादूगाराने राजकन्येला पुन्हा खुर्चीत बसविले व राजपुत्रास राखण करण्यास सांगितले. जादूगार म्हणाला, "ही तुझी शेवटची संधी आहे. जर ही संधी घालवलीस तर तुम्हां सर्वांना दगड व्हावे लागेल."

राजपुत्र तिन्ही मित्रांना म्हणाला, "आज रात्री आपण जागू या." ते सर्वांनी मान्य केले व ते येरझारा घालू लागले पण मध्यरात्रीनंतर त्यांना झोप अनावर झाल्यामुळे ते झोपले. राजकन्या नाहीशी झाली.

पहाटे त्यांना जाग आली. राजकन्या कोठे दिसेना. तेजूने पाहिले. तो म्हणाला, "महाराज, राजकन्या फार दूर गेली आहे." राजपुत्राने विचारले, "फार दूर म्हणजे कोठे?" तेजू म्हणाला, "तीनशे मैलांवरील काळ्या समुद्रातील एका शिंपल्यात ती अंगठी होऊन बसली आहे. पण घाबरू नका. आपण तिला येथे परत आणू."

मग लंबू ढबू व तेजूला घेऊन निघाला. ते काळ्या समुद्रावर पोचले. तेजूने लंबूला तो समुद्रतळातील शिंपला दाखविला. लंबूने हात लांब केला. पण समुद्र फार खोल होता. लंबूचा हात तळाशी पोचेना. मग ढबूने समुद्र पिण्यास सुरुवात केली. पाणी पिऊन तो डोंगराएवढा लठ्ठ झाला. लंबूने नंतर तो शिंपला बाहेर काढला आणि ते तिघेजण लोखंडी किल्ल्यात परत आले. ढबूने सर्व पाणी परत समुद्रात सोडून दिले.

पण या कामात त्यांचा बराच वेळ गेला. त्यांना उशीर होत होता. ते किल्ल्याच्या दाराशी आले. एवढ्यात जादूगार राजपुत्राच्या खोलीत आला.

लंबूने हात लांब करून ती अंगठी त्या खोलीत टाकली. त्या अंगठीची राजकन्या झाली. राजपुत्राला आनंद झाला. तो मित्रांची वाटच पाहत होता. जादूगार ते पाहून गांगरला व म्हणाला, "अखेर तू जिंकलेस."

एवढ्यात त्या जादूगाराचा कावळा झाला आणि तो उडून गेला. तो

पुन्हा कधी परत दिसला नाही.

राजकन्या बोलू लागली. ती फार खूष होती. किल्ल्यातील सर्व दगडी पुतळे सजीव झाले. तबेल्यातील घोडे जिवंत झाले. नदी पूर्वीप्रमाणे वाहू लागली.

राजपुत्र राजकन्येला घेऊन घरी परत आला. राजाला फार आनंद झाला. लंबू, ढबू आणि तेजू मोठे बक्षीस घेऊन परत गेले. राजपुत्राचे राजकन्येशी मोठ्या थाटामाटात लग्न झाले.

सर्वत्र आनंदीआनंद झाला.


---

## जादूचा बैल

एक नीला नावाची सुंदर मुलगी होती. तिचे बाबा फार प्रेमळ होते. पण तिची सावत्र आई नीलाचा फार छळ करीत असे. तिच्याकडून ती भरपूर काम करून घेई. परंतु पुरेसे व चांगले खावयास देत नसे. त्यामुळे नीला फार दुःखी होती.

तिच्या बाबांकडे बऱ्याच गाई व एक तांबड्या रंगाचा बैल होता. ती त्यांची देखभाल करीत असे. एके दिवशी ती गाई व बैल यांना चरायला घेऊन गेली असताना तिला फार भूक लागली आणि ती रडू लागली. बैलाने विचारले, "तू का रडतेस?" ती म्हणाली, "आज आईने मला खावयास काही दिले नाही. मला फार भूक लागली आहे." बैल म्हणाला, "मग तू माझ्या डाव्या कानात हात घाल. तुला काहीतरी खाण्यास मिळेल."

तिने बैलाच्या कानात हात घातला. तिला ब्रेडचा एक सँडविच मिळाला. तिने सँडविच आनंदाने खाल्ला. त्या दिवसापासून तिला जेव्हा जेव्हा भूक लागे त्या त्या वेळी बैलाच्या कानातून सँडविच काढून खाई. त्यामुळे तिची प्रकृती सुधारली. ती किंचित लठ्ठ झाली. तिचे डोळे चमकदार दिसू लागले.



सावत्र आईच्या ही गोष्ट लक्षात आली. तिला संशय आला की तिला कोणीतरी खायला देत असावे. तिने नीलावर पाळत ठेवली आणि नीलाला बैलाच्या कानातून सँडविच काढून खाताना पाहिले. तिला फार राग आला. तिने बैलाला ठार मारायचे ठरविले. बैलाचे लक्ष होतेच. बैल नीलाला म्हणाला, "मुली, सावत्र आई चोरून सर्व पाहते. ती मला ठार मारण्याचे बोलत होती. मी मेलो तर तू पूर्वीसारखी उपाशी व दु:खी राहाशील. पण तुझी तयारी असेल तर आपण दोघं आज रात्री पळून जाऊ."

"हो, हो. मी तुझ्याबरोबर कोठेही यायला तयार आहे." ती म्हणाली.

रात्री नीलाने आपल्या वस्तू एका गाठोड्यात बांधल्या. अंधार पडल्यावर ती व बैल दूरदूर निघून गेले. चालत चालत ते एका जंगलात आले. बैल म्हणाला, "हे तांब्याचे जंगल आहे. सर्व झाडांना तांब्याची पाने

लटकली आहेत. काळजी घे. तांब्याच्या पानाला स्पर्श करू नकोस. जर एखादे पान खाली पडले तर मोठा आवाज होईल व जंगलातील अस्वले जागी होतील व आपल्याला फाडून खातील." त्या दोघांनी काळजीपूर्वक अलगदपणे ते जंगल पार केले.

त्याच्यापुढे चांदीचे जंगल होते. तेथील झाडांना चांदीची पाने होती. त्या पानांना स्पर्श करून पान खाली पडले व आवाज झाला तर अनेक विंचू बाहेर पडंत आणि चावत. ते काळजीपूर्वक चालू लागले. पण नीलाचा हात लागून एक पान खाली पडले व आवाज झाला. ताबडतोब विंचू बाहेर आले. बैलाने जमिनीवर लोळण घेतली व सर्व विंचवांना चिरडून टाकले. मग त्या दोघांनी ते जंगल अलगदपणे पार केले.

मग पुढे त्यांना सोन्याचे जंगल लागले. सर्व झाडांना सोन्याची पाने होती. पण पान खाली पडले की शेकडो सिंह धावून यायचे. या वेळी त्यांनी फारच काळजी घेतली व ते जंगल पार केले. पण अखेर बैलाचे शिंग लागून एक सोन्याचे पान खाली पडलेच व मोठा आवाज झाला. त्वरित सिंह धावून आले. बैलाने खूप प्रतिकार केला पण तो जखमी झाला. बैल म्हणाला, "आता तू पुढे एकटी जा. मी येऊ शकत नाही. या जखमांनी मी येथेच मरणार. मला येथेच पुरून टाक. तू पुढे जा. तुला एक राजवाडा दिसेल. राजवाड्यात तू काम मिळव. तुला काही अडचण आली तर येथे ये. माझी आठवण कर. मी तुला मदत करीन." असं म्हणून बैलानं मान टाकली. नीलाने बैलाला मातीत पुरले व दुःखी मनाने ती पुढे निघाली.

नीलाला एक मोठा राजवाडा दिसला. ती राजवाड्यात गेली व तिने काम मागितले. तेथे राहणाऱ्या राजपुत्राने कोंबड्या सांभाळण्याचे तिला काम दिले. तिच्या अंगावरचे फाटके कपडे पाहून नवीन कपडे दिले. वर घालायला तिला एक लोकरीचे निळे जाकिट दिले व तिचे 'निळूबाई' असे नाव ठेवले. ती तिथे काम करू लागली.

दर रविवारी राजवाड्यातील सर्व नोकर चर्चमध्ये जायचे. पाकखान्यात लक्ष ठेवायला कोणीतरी पाहिजे म्हणून निळूबाईला राजवाड्यात ठेवायचे. सर्वजण चर्चला गेले. तिलाही

चर्चला जावेसे वाटू लागले. पण ती जाणार कशी? राजवाड्यात लक्ष ठेवायला पाहिजे ना? तिला एकदम बैलाची आठवण झाली. त्याला पुरला होता तेथे ती पळत गेली व म्हणाली, "मित्रा, कोणाला तरी राजवाड्यात लक्ष ठेवायला सांग व मला चांगला ड्रेस दे. मी चर्चमध्ये जाऊन येते." एवढ्यात एक लाल रेशमी पोषाख तेथे आला आणि एक ससा पळतपळत राजवाड्यात राखण करण्यास गेला.

तो सुंदर पोषाख घालून ती चर्चला गेली. तिने प्रार्थनेत भाग घेतला. ती फारच सुंदर दिसत होती. सर्वजण मनातल्या मनात तिच्या सौंदर्याची तारीफ करीत होते. राजपुत्राचेही तिच्याकडे लक्ष होतेच. चर्च संपल्यानंतर तो तिला भेटणार होता. पण ती त्यापूर्वीच सटकली. निळूबाई होऊन राजवाड्यात राखण करू लागली.

त्यापुढच्या रविवारीही हाच प्रकार घडला. सर्वांना तिचा चंदेरी पोषाख आवडला. पण ती कोण हे कळलेच नाही. कारण ती सर्वांच्या अगोदर निघून गेली होती. तिसऱ्या रविवारी तेच घडले. ती सोनेरी पोषाख करून चर्चला गेली. पण ती बाहेर जाताना राजपुत्राने पाहिले आणि तोही तिच्या पाठोपाठ निघाला. पण ती झपाट्याने पळू लागली. तिच्या झग्याचे एक टोक त्याच्या हातात सापडले व तिचा एक बूट पायातून निघून पडला व राजपुत्राला तो सापडला. ती पळून गेली.

राजपुत्राने तो बूट कोणाचा आहे हे शोधून काढण्याचे ठरविले. त्याने राजधानीतील सर्व श्रीमंत महिलांना मेजवानीला पाचारण केले व जिच्या पायात तो बूट बसेल त्या मुलीशी मी लग्न करीन असे जाहीर केले. त्याप्रमाणे मेजवानीचा मोठा बेत ठरविण्यात आला. अनेक मुली मेजवानीला आल्या.

एका श्रीमंत मुलीने त्या बुटात बसेल असा आपला पाय कापण्याचे ठरविले व त्याप्रमाणे केले. तो बूट तिच्या पायात ठीक बसला. राजपुत्राने ते पाहिले. ती श्रीमंत मुलगी कुरूप होती. पण राजपुत्राला तिच्याशी लग्न करणे भाग होते. तसे त्याने जाहीर केले होते. लग्नाच्या आदल्यादिवशी एक लहान सुंदर पक्षी त्याच्या डोक्याभोवती घिरट्या घालू लागला व म्हणाला, "त्या मुलीने पायाला बँडेज बांधले आहे. तिने

तुला फसवले आहे."

ती मुलगी जवळच होती. राजपुत्राने तिचा पाय पाहण्याचे ठरविले. ती आधी कबूल होईना. पण शेवटी राजपुत्राने हट्ट धरून तिचा पाय पाहिला. त्याला तिची लबाडी कळून आली. त्याने ते लग्न रद्द केले.

राजपुत्राने मग राजधानीतील गरीब मुलींना मेजवानीस बोलावले. त्याने सर्व मुली पाहिल्या पण त्याला चर्चमध्ये भेटलेली मुलगी दिसली नाही. कोणाच्या पायाला तो बूटही बसेना.

राजपुत्र फार उदास झाला. त्याला अन्नपाणी गोड लागेना. तो आजारी झाला. राजवाड्यातले सर्व नोकर त्याची सेवा करीत. निळूबाई गाणी म्हणून त्याची करमणूक करी.

एकदा निळूबाई राजपुत्राच्या महालात असताना राजपुत्राचे तिच्या पायांकडे सहज लक्ष गेले. तिचे पाय लहान व फारच सुंदर होते. त्याला आश्चर्य वाटले. त्याने तिला हाक मारून विचारले, "निळूबाई, तो तू बूट घालून पाहिलास का?" ती चपापली व "नाही" म्हणाली.

राजपुत्राने बळजबरीने तो बूट तिला घालायला लावला. तो तिच्या पायात सुरेख बसला.

राजपुत्र म्हणाला, "मला तुझ्याशी लग्न करायला पाहिजे. तो बूट तुला चांगला बसतो."

तिला मनातून फार फार आनंद झाला. ती पळत पळत बैलाला पुरलेल्या जागेजवळ गेली आणि तिने त्याला ही बातमी दिली. बैलाने तिला पुन्हा सोनेरी पोषाख, अलंकार व बूट दिले. तो पोषाख अंगावर चढवून ती राजवाड्यात आली व राजपुत्रासमोर उभी राहिली. या पोषाखात त्याने तिला ताबडतोब ओळखले आणि प्रेमाने जवळ घेतले.

राजपुत्र बरा झाला आणि त्यांचे लग्न झाले. ते सुखाने राहू लागले.

---

# लुईबाबा

एका खेडेगावात शेतकरी लुईबाबा व त्याची बायको मेरी राहत होते. ती दोघं म्हातारी झाली होती व फार गरीब होती. त्यांचे छोटे घर होते व घराभोवती फळझाडांची बाग होती. फळांची विक्री करून ते आपला चरितार्थ चालवीत.

एकदा खूप मोठे वादळ झाले. वाऱ्याने त्याची सर्व फळझाडे जमीनदोस्त झाली. त्यांना फार दुःख झाले. वाऱ्याविरुद्ध वाऱ्याच्या आईकडे तक्रार करायचे लुईबाबाने ठरविले. तिच्याकडून कदाचित काही मदत मिळेल असे त्याला वाटले. त्याने आपल्या काठीच्या टोकाला एक ब्रेड बांधून घेतला व काठी खांद्यावर टाकून तो निघाला. तो खूप वेळ चालत होता. अखेर तो वाऱ्याच्या घरी पोचला.

वाऱ्याच्या आईने त्याचे स्वागत केले. ती म्हणाली, "या. आपले स्वागत असो. काय काम आहे?" लुईबाबा म्हणाला, "मी तुझ्या मुलाबद्दल तक्रार घेऊन आलो आहे. त्याने काल रात्री माझ्या फळबागेतील सर्व फळझाडे उखडून टाकली. माझे फार नुकसान झाले. आता आमची उपासमार होणार. तू काही मदत करू शकशील का?" वाऱ्याची आई म्हणाली, "तुम्ही माझ्याकडे आलात हे छान केले. काही काळजी करू नका. मी तुम्हाला एक टॉवेल देते. तो तुम्हाला सर्व काही देईल व तुम्हाला आयुष्यभर कष्ट करावे लागणार नाहीत. फक्त याची चांगली काळजी घ्या. हरवू नका." तिने घरातून एक टॉवेल आणून दिला व ती म्हणाली, "तुम्हांला भूक लागेल तेव्हा हा टॉवेल जमिनीवर पसरायचा आणि म्हणायचे 'टॉवेल, तुझे काम कर' आणि टॉवेलवर खाद्यपेय पदार्थ येतील."

लुईबाबा टॉवेल घेऊन आभार मानून आनंदाने परत निघाला. अर्धा रस्ता संपल्यानंतर त्याला भूक लागली. त्याने टॉवेल पसरला व जेवण

मागवले. टॉवेलवर भरपूर अन्नपदार्थ आले. त्याने जेवण केले व टॉवेल गुंडाळून तो पुढे निघाला.

गावाजवळ येताच त्याला गावातील हॉटेल दिसले. हॉटेलचा मालक व मालकीण दारातच उभे दिसले. त्यांना लुईबाबा वाऱ्याच्या आईकडे गेल्याचे माहीत होतेच. त्यांनी त्याला आग्रहाने हॉटेलात नेले व विचारले, "लुईबाबा, वाऱ्याची आई काय म्हणाली?" "तिने मला एक जादूचा टॉवेल दिला." असं म्हणून त्याने टॉवेल जमिनीवर पसरून अन्न बोलाविले व त्या दोघांना भरपूर जेवू घातले. त्यांना ते पाहून आश्चर्य वाटले व हेवाही वाटला. लुईबाबाने मग तिथेच थोडा वेळ विश्रांती घेतली. तो झोपलेला पाहून मालकिणीने तो जादूचा टॉवेल कपाटात लपवून ठेवला व अगदी तसाच दुसरा टॉवेल लुईबाबाच्या पिशवीत ठेवला. थोड्या वेळाने तो आपली पिशवी काठी घेऊन घरी गेला.

त्याने मेरीला सर्व हकिकत सांगितली. ती खूष झाली. त्याने टॉवेल पसरून जेवण मागविले, पण अन्न आले नाही. मेरी चिडली व म्हणाली, "एवढे कष्ट करून काय आणलेत तर एक जुना टॉवेल." त्यालाही आश्चर्य वाटले. त्याने परत वाऱ्याच्या आईकडे जाण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो परत निघाला. वाऱ्याच्या आईने त्याचे स्वागत करून पुन्हा येण्याचे कारण विचारले. त्याने सर्व हकिकत सांगितली. ती म्हणाली, "काही तरी गडबड आहे. कोणीतरी तो टॉवेल बदलला. तू काळजी करू नकोस. मी तुला एक बदक देते. ते बदक समोर ठेवून तू म्हणायचे 'बदका, चांदी दे' किंवा 'बदका, सोने दे' आणि प्रत्येक वेळी ते बदक तुला पाहिजे तेवढी चांदी किंवा सोने देईल. मात्र तू बदकाची नीट काळजी घे. नाहीतर ते चोरीला जाईल. सर्व नीट लक्षात ठेव. पुन्हा परत येऊ नकोस."

बदक घेऊन लुईबाबा निघाला. अर्ध्या वाटेत आल्यावर त्याने बदकाला जमिनीवर ठेवले व तो म्हणाला, "बदक, चांदी दे." बदकाने भरपूर चांदीची नाणी दिली. नंतर तो म्हणाला, "बदक, सोने दे." बदकाने सोन्याची नाणी दिली. त्याने जेवण विकत घेतले व तो आपल्या

गावाजवळ आला. हॉटेलचा मालक व मालकीण त्याची वाटच पाहत होते. त्यांनी त्याला हॉटेलात घेतले व काय आणले म्हणून विचारले. तो म्हणाला, "या वेळी वाऱ्याच्या आईने मला बदक दिले. ते बदक मी मागेन तेव्हा मला चांदी-सोने देते." त्यांचा विश्वास बसेना. त्यांनी त्याला प्रत्यक्ष दाखविण्यास सांगितले. त्याने त्यांना तो प्रयोग करून दाखविला. त्यांनी आनंदाचे नाटक करून लुईबाबाला भरपूर दारू पाजली. त्याला झोप लागली. तो झोपलेला पाहून मालकिणीने ते जादूचे बदक लपविले व त्या जागी तसेच दिसणारे दुसरे बदक ठेवले.

थोड्या वेळाने लुईबाबा बदक घेऊन घरी गेला. मेरीसमोर खिसे रिकामे करून त्याने सोन्याचांदीच्या नाण्यांचे ढीग टाकले व बदकाची माहिती सांगितली. त्याने बदक समोर ठेवून नाणी मागितली. पण बदकाने नाणी दिली नाहीत. लुईबाबा उदास झाला. "वाऱ्याच्या आईने गरिबाची थट्टा केलेली दिसते. मला परत एकदा तिच्याकडे जाऊन जाब विचारला पाहिजे."

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून परत वाऱ्याच्या आईकडे गेला. त्याला पाहून ती रागावली व म्हणाली, "तू पुन्हा आलास! तरी मी तुला बजावले होते. आता तुला काय पाहिजे?" त्याने घडलेली हकिकत सांगितली. ती म्हणाली, "तुला दारू पिणे आवडते. त्यानेच हा घोटाळा केला. दोन्ही वेळा दारू पिऊन तू त्या हॉटेलात झोपलास व तुझा टॉवेल व बदक तेथे बदलले गेले." नंतर तिने कपाटातून एक काठी काढून त्याला दिली व म्हणाली, "ही काठी साधी नाही. या काठीला सांगायचे, 'फ्लिक फ्लिक फ्लिक. काठी काम कर.' "असे तिने म्हणताच त्या काठीने लुईबाबाला झोडपायला सुरुवात केली. तो ओरडू लागला व दया मागू लागला. "फ्लिक फ्लिक फ्लिक. काठी, माघारी ये." काठी परत तिच्या हातात आली. "ही काठी घेऊन जा. हिचा उपयोग कर. थोडं डोकं वापर." ती म्हणाली.

लुईबाबा काठी घेऊन निघाला. वाटेत जंगलात काठीची परीक्षा पाहिली. काठीने झाडाला झोडपले व झाडाची पाने व फांद्या इतस्ततः पसरल्या.मग तो काठी घेऊन गावाजवळ आला. हॉटेलचा

मालक-मालकीण त्याला लुबाडण्यास त्याची वाटच पाहत होते. तो दिसताच त्यांनी त्याला आत बोलाविले आणि विचारले, “वाऱ्याच्या आईने काय दिले?” “तिने मला ही काठी दिली.” तो म्हणाला. “ही चोरांचा प्रतिकार करते. मी प्रत्यक्षच दाखवितो.” मग त्याने मंत्र म्हणताच काठीने उडी मारली आणि ती हॉटेलच्या मालक-मालकिणीला सपासप झोडपू लागली. ते ओरडू व रडू लागले, क्षमा मागू लागले. पण काठी थांबेना. लुईबाबा म्हणाला, “तुम्ही माझा टॉवेल व बदक चोरलेत व मला फसविलेत. ते ताबडतोब परत करा नाहीतर ही काठी तुम्हांला ठार मारील.” त्यांनी पळत पळत टॉवेल व बदक आणून दिले. मग मंत्र म्हणून लुईबाबाने काठीला शांत केले.

नंतर तो टॉवेल, बदक व काठी घेऊन घरी गेला. त्याने सर्व परत आणले आहे असे सांगितले. मेरी हसू लागली. त्याची चेष्टा करू लागली. त्याने काठीचा मंत्र म्हटला. काठी मेरीला मारू लागली. तिने क्षमा मागितली व त्याने काठीला शांत केले. मग त्याने टॉवेल पसरून जेवण मागविले. ती दोघं पोटभर जेवली. मग त्यांनी बदकाकडून भरपूर सोन्या-चांदीची नाणी मिळवली व ती कशी खर्च करायची याच्या याद्या केल्या.

ती दोघं मजेत राहू लागली.

---

## जाळीदार डबा

जंगलात नदीच्या काठावर एका झोपडीत भिवा व शेवंता राहत होते. ते जोडपे गरीब होते. ते जंगलात लाकडी कोळसा तयार करण्याचे काम करीत. खूप कष्ट करूनही त्यांना पोटभर अन्न मिळत नसे. त्यामुळे त्यांची उपासमार होत असे.

एके दिवशी संध्याकाळी शेवंता भुकेने व्याकूळ झाली आणि भिवाला म्हणाली, “आपण मरमर काम करतो पण आपणांस पुरेशी

मजुरी मिळत नाही. आपल्या देशाच्या राजाराणीचे बघा. ते दिवसभर काही काम करीत नाहीत. नुसते मिरवतात. पण त्यांना भरपूर खायला-प्यायला मिळते. चांगले चांगले कपडे घालायला मिळतात. स्वर्गात असल्यासारखे ते राहतात. आपल्याला त्यांच्यासारखे जीवन जगायला मिळाले पाहिजे."

त्याच वेळी त्या देशाचा राजा त्यांच्या झोपडीजवळून चालला होता. तो त्याच जंगलात शिकारीसाठी आला होता. राजाने शेवंता आणि भिवा यांचे बोलणे ऐकले. राजाने त्यांच्या दारावर थाप मारली. "कोण आहे?" शेवंताने विचारले. "मी या देशाचा राजा आहे. दार उघड." राजा म्हणाला. शेवंताने दार उघडले व राजा आत आला.

भिवा व शेवंता आश्चर्याने राजाकडे पाहू लागली. राजा म्हणाला, "तुम्ही दोघं दुःखी आहात असं मी ऐकलं." शेवंता म्हणाली, "आमची उपासमार होत आहे. मग आम्ही काय करावं?" राजा म्हणाला, "मला तुमची दया येते. तुम्ही दोघं माझ्याबरोबर राजवाड्यात राहायला चला. तेथे तुम्हाला भरपूर खायला मिळेल, चांगले कपडे मिळतील. काही काम करावे लागणार नाही. फक्त मी सांगेन ती छोटी गोष्ट तुम्हाला करावी लागेल."

शेवंता व भिवाला फार आनंद झाला. त्यांनी झोपडी बंद केली व ती दोघं राजवाड्यात आली. त्यांनी नवीन कपडे घातले. भरपूर भोजन केले आणि पलंगावर आराम केला.

नंतर राजा त्यांच्याकडे आला व म्हणाला, "जर तुम्हाला काही लागले तर मागून घ्या. मजेत राहा. त्या जेवणाच्या टेबलावर एक जाळीदार डबा आहे. त्याचे झांकण तुम्ही कधीही काढायचे नाही. ते केलेत तर तुम्हाला परत तुमच्या झोपडीत जावे लागेल. एवढी छोटी गोष्ट माझ्यासाठी करा." मग राजा निघून गेला. काही दिवस मजेत गेले. ती दोघं चैनीत राहत होती. त्यांना रोज निरनिराळे आवडीचे पदार्थ खायला मिळत होते. त्या टेबलावर मध्यभागी तो जाळीदार डबा ठेवलेला असे. त्या डब्याबद्दल त्या दोघांच्या मनांतील कुतूहल सारखे वाढत होते. शेवंता भिवाला नेहमी विचारी, "त्या डब्यात काय असेल बरे?" भिवा

म्हणाला, "पण राजाने त्या डब्याचे झाकण कधी उघडायचे नाही अशी आपल्याला ताकीद केली आहे."

पण शेवंताच्या मनातून त्या डब्याचा विचार जाईना. तिला अन्न गोड लागेना. ती सारखी त्या डब्याचाच विचार करायची. भिवा म्हणाला, "शेवंता, तू त्या डब्याचा विचार सोडून दे. तू काही खाल्ले नाहीस तर फुकट मरशील मात्र." शेवंता म्हणाली, "चालेल. पण त्या डब्यात काय आहे ते मला कळलेच पाहिजे." भिवा म्हणाला, "जर तू डबा उघडलास तर हे सुख सोडून परत झोपडीत जावे लागेल." "नाही नाही. डब्याचे झाकण जरा किलकिले करून आपण पाहू व पुन्हा बंद करू. कोणाला काही कळणार नाही." शेवंता म्हणाली.

एकदा ती दोघंच खोलीत असताना त्यांनी त्या डब्याचे झांकण थोडे उघडले. काय होते आत? एक छोटा उंदीर. झाकण किलकिले होताच तो चटकन बाहेर आला व पळून गेला. भिवा व शेवंताने उंदराला पकडण्याचा निष्फळ प्रयत्न केला.



एवढ्यात दरवाजा उघडून राजा आत आला. भिवा व शेवंता टेबलाखाली उंदराचा पाठलाग करीत होते. राजाला पाहून ती दोघं शरमेने खजिल झाली होती. ती दोघं टेबलाखालून बाहेर आली नाहीत. राजा म्हणाला, "बाहेर या. तुम्ही दोघं मूर्ख आहात. मूर्खांसाठी राजवाडा नसतो. तुम्ही परत तुमच्या झोपडीत जा."

ती बिचारा राजवाडा सोडून परत जंगलातील आपल्या झोपडीत राहावयास गेली.

---

## खुडबुड्या ज्योतिषी

एक गरीब हमाल होता. तो जड ओझी उचलून, दिवसभर कष्ट करून जे थोडे पैसे मिळत त्यावर तो व त्याची बायको यांची कशीबशी गुजराण करीत असे. एकदा हमालाची बायको गावातील तळ्यावर स्नानाला गेली होती. तिच्या मागोमाग तेथील राजाच्या दरबारातील मुख्य ज्योतिषाची बायको स्नानाला आली. हमालाच्या बायकोचे कपडे तेथील तळ्याच्या पायरीवर पाहताच तिला राग आला. तिने लाथेने ते कपडे पाण्यात फेकले. हमालाच्या बायकोला ते आवडले नाही. ती ओले कपडे घालूनच घरी आली व घडलेला प्रकार नवऱ्याला सांगितला. हमाली सोडून ज्योतिषाचा धंदा करायला हमालाला सुचविले. हमाल हसू लागला व म्हणाला, "ही गोष्ट सोपी आहे का? मला लिहिता-वाचता येत नाही. मग मी ज्योतिषी कसा होणार?"

"ते मला काही माहीत नाही." त्याची बायको म्हणाली. "तुम्ही ज्योतिषी झालंच पाहिजे. नुसतं ज्योतिषी नव्हे, तर राजाच्या दरबारात मुख्य ज्योतिषी झालं पाहिजे म्हणजे त्या बाईची मिजास खाली येईल. जर तुम्ही असं केलं नाहीत तर मी तुम्हाला सोडून जाईन व दुसरं लग्न करीन."

बायकोचा फारच हट्ट पाहून हमालाने हमाली सोडली आणि पंचांग

विकत घेतले आणि एक कुंडली काढलेला फलक तयार केला. त्याने एक दुकान भाड्याने घेतले व आपला ज्योतिषाचा धंदा सुरू केला. पहिल्याच दिवशी त्याला चांगले गिऱ्हाईक मिळाले.

त्याच्या दुकानात बरेच लोक आले. ते बादशहाची खेचरे नेणारे वाहक होते. ते म्हणाले, "आमचे एक खेचर हरवले आहे. त्याच्या पाठीवर चांदीने भरलेल्या पिशव्या होत्या. ते खेचर जर सापडले नाही, तर आम्हाला जबर शिक्षा होईल. तरी आमच्यावर दया करा. आम्हाला खेचर कोठे सापडेल ते सांगा. आम्ही तुम्हाला भरपूर बक्षिसी देऊ."

त्या हमालाला ज्योतिष कसे बघतात काहीच माहीत नव्हते. म्हणून त्याने जे तोंडाला येईल ते सांगण्याचे ठरवले. त्याने डोळे मिटले व तो म्हणाला, "एक शेर फुटाणे व एक शेर बेदाणे घ्या. ते सारखे वाटून घ्या. एक एक तोंडात टाकीत तुम्ही सर्वजण एकापाठोपाठ जा. जेथे दाणे संपतील तेथे खेचर सापडेल."

ते खूष झाले. त्यांनी हमालाला थोडे पैसे दिले. ते फुटाणे व बेदाणे खात निघाले. चालता चालता ते एका पडक्या इमारतीजवळ आले. त्यांचे दाणे संपत आले होते. तोच त्यांना समोर खेचर दिसले. ते ज्योतिषावर फार खूष झाले. ते खेचर घेऊन परत आले व त्यांनी हमालाला मोठे बक्षीस दिले व ते म्हणाले, "या पाच सोन्याच्या मोहरा घ्या. तुम्ही फारच छान भविष्य जाणता."

हमालालाही आनंद झाला. घरी गेल्यावर त्याने बायकोला सर्व हकीकत सांगितली व पाच मोहरा दिल्या. "मी सांगितले नव्हते तुम्हाला की हमाली सोडून ज्योतिषी व्हा म्हणून?" ती म्हणाली, "हमाली करून आपण अर्धपोटी राहत होतो. आता पहा कसे राजाराणीसारखे बसलो आहोत." तो म्हणाला, "सर्व परमेश्वराची कृपा. पण रोजच भविष्य खरे ठरेल कशावरून? मला भीती वाटते. मी परत हमाली सुरू करतो." पण त्याच्या बायकोने त्याला परावृत्त केले.

दुसऱ्या दिवशी तो दुकानात गेला तर दाराशी त्या शहराचे महापौर, मुख्य न्यायाधीश व कोतवाल त्याची वाट पाहत होते. हमालाला भीती वाटली. त्याला वाटले की आपले दुकान बंद करायलाच ते आले

असावेत. हमाल दिसताच ते म्हणाले, "या ज्योतिषी महाराज, आम्ही तुमचीच वाट पाहत आहोत. तुमचे कालचे भविष्य खरे झाल्याचे ऐकले म्हणून धावतच तुमच्याकडे आलो. एक महिन्यापूर्वी बादशहाची तिजोरी लुटली गेली आहे. त्याने आम्हांला चाळीस दिवसांत चोरांचा शोध लावण्याची ताकीद केली आहे. आम्ही गेले तीस दिवस कसून शोध केला. बादशहाच्या मुख्य ज्योतिषालाही विचारले पण काहीच यश आले नाही. तरी आमच्यावर दया करून मार्गदर्शन करा. तुम्हाला मोठे बक्षीस देऊ. आम्हाला वाचवा."

हमाल मनातून चांगलाच हबकला. बायकोने त्याच्या मागे ज्योतिषाचे हे लफडे लावून दिल्याबद्दल त्याला खूप राग आला. आता काय करावे? हा त्याला विचार पडला. तो डोळे मिटून स्वस्थ बसला. त्या तीन अधिकाऱ्यांना वाटले की तो आपल्या संकटाचा विचार करीत आहे. ते खूष होते. त्यांनी त्याच्यापुढे पाचशे सोन्याची नाणी ठेवली. हमाल म्हणाला, "ठीक आहे. मी विचार करतो. तुम्ही उद्या सकाळी याच वेळी या." ते निघून जाताच हमालाला वाटले की ती सोन्याची नाणी घेऊन लांब पळून जावे व येथे परत येऊच नये. पण जाणार कोठे? कोठेही गेलं तरी ते पकडतीलच.

हमालाला कल्पना नव्हती की चोरांपैकी एक त्याच्या दुकानाजवळच होता. त्या चोरांच्या मुख्याने त्याला महापौरांवर लक्ष ठेवण्यास सांगितले होते. त्याने आपल्या पुढाऱ्यास खबर दिली की सर्व अधिकारी त्या ज्योतिषाकडे आले होते व त्याने त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी बोलाविले आहे. हे ऐकून ते चोर घाबरले. त्यांनी ज्योतिषावर पाळत ठेवली. रात्री तो आपल्या बायकोला काय काय सांगतो ते त्यांनी ऐकण्याचे ठरविले.

हमाल घरी येताच बायकोने विचारले, "आज किती कमाई झाली?" "पाचशे मोहरा" तो म्हणाला व त्याने सर्व हकिकत सांगितली. ती म्हणाली, "मी सांगत नव्हते की हा धंदा तुम्हाला चांगला जमेल म्हणून." "पण उद्या त्या अधिकाऱ्यांना काय सांगू?" हमालाने विचारले. "राजाला हे समजले तर तो मला तुरुंगात डांबील."

ते चोर त्याच्या पाळतीवर होतेच. त्यांना फक्त 'तुरुंगात डांबील' हे शब्द ऐकू आले. ते घाबरले व म्हणाले, "हा काही सामान्य ज्योतिषी नाही. तो जादूगार व मांत्रिक असावा. आपण त्याला सोन्याने वश करण्याचा प्रयत्न करू."

चोरांच्या मुख्याने हमालाच्या घराचा दरवाजा ठोठावला. "कोण आहे?" हमालाने विचारले. "महाराज, मी गरीब आपणांशी बोलू इच्छितो." तो म्हणाला. हमालाने दार उघडले व त्याला आत घेऊन विचारले, "तू कोण आहेस? तुला काय पाहिजे?" "महाराज, आपण सर्व जाणता. मी चोरांचा पुढारी आहे. माझे चाळीस साथीदार आहेत. तुम्हाला माहीत आहेच की आम्ही राजाच्या तिजोरीतून हिरेमाणके चोरून शहराबाहेरच्या मशिदीत लपवून ठेवली आहेत. तुम्ही ती उद्या अधिकाऱ्यांना द्या. पण कृपा करून आमची नावे सांगू नका." तो म्हणाला व त्याने थैलीभर सोन्याची नाणी हमालाला दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळी हमाल आपल्या दुकानात गेला तोच तेथे तिन्ही अधिकारी हजर झाले. त्याने शांतपणे दुकान उघडले. देवाची प्रार्थना केली. नंतर तो डोळे मिटून बसला व म्हणाला, "तुम्ही दहा मैलांवरील बागेजवळ जा. तेथे एक मशीद आहे. त्या मशिदीच्या तळघरात बादशहाची चोरीस गेलेली हिरेमाणके सापडतील ती घेऊन जा." त्याप्रमाणे अधिकारी गेले व त्यांना सर्व संपत्ती मिळाली. ते फार खूष झाले.

त्यांनी बादशहाला सर्व वृत्तांत सांगितला. त्याने हमालाला बोलावून घेतले व त्याला सोन्याचा जाड पेला बक्षीस दिला. काही दिवसांनंतर राजकन्येची मौल्यवान हिऱ्याची अंगठी हरवली. ती कोणाला सापडेना. मुख्य ज्योतिषाला काही सांगता आले नाही. मग बादशहाने हमालाला बोलावून अंगठीबद्दल विचारले. हमालाला घाम फुटला. तो डावीकडे व उजवीकडे पाहू लागला. मग तो समोरच्या भिंतीकडे पाहत म्हणाला, "महाराज, मला भिंतीतील फक्त एक भोक दिसते त्यामध्ये ती अंगठी आहे." हे वाक्य कानी पडताच राजकन्येला आठवले व ती म्हणाली, 'बरोबर. अंघोळ करताना मी ती अंगठी भिंतीमधील एका भोकात ठेवून

दिली." ती धावत गेली व अंगठी घेऊन आली. हमालाच्या ज्योतिषाचे सर्वांना कौतुक वाटले. राजाने त्याला मोठे इनाम दिले व त्याला दरबारातील मुख्य ज्योतिषाची जागा दिली. राजाने तसे फर्मान काढले. पूर्वीच्या मुख्य ज्योतिषाला पेन्शन दिले.

हमालाजवळ आता बरीच संपत्ती जमा झाली होती. त्याची बायको खूष होती. त्याला ज्योतिषाचा कंटाळा आला होता. आपले बिंग केव्हाहा फुटेल अशी त्याला भीती वाटत होती. हमाली परवडली पण ज्योतिष नको असे त्याला वाटत होते. म्हणून त्याने वेड लागल्याचे ढोंग करण्याचे ठरविले. त्याने केस पिंजारले व तो दरबारात बादशहावर धावून गेला. त्याने त्याचा मुकुट उडविला. बादशहाला आश्चर्य वाटले. पण एवढ्यात त्याच्या मुगुटातून एक साप बाहेर पडला व पळू लागला. बादशहाने ते पाहिले व म्हणाला, "तू माझे प्राण वाचविलेस. तो मुगुटातील साप मला नक्कीच चावला असता." बादशहाने हमालाचा मोठा सन्मान केला.

पुढे एकदा टबमध्ये स्नान करीत असतां तो फक्त चड्डी घालून राजवाड्याकडे पळाला. त्याला पाहून लोक त्याला वेड लागल्याचे बोलत होते. पण तो थेट बादशहाकडे गेला व त्याच्या हाताला धरून बाहेर ओढीत मैदानात आला. एवढ्यात राजवाडा कोसळला. त्याने बादशहाचे पुन्हा प्राण वाचवले म्हणून सर्वत्र त्याचे कौतुक झाले. बादशहाने त्याला सर्वोच्च किताब व भरपूर संपत्ती दिली.

हमाल हतबुद्ध झाला. त्याचे ज्योतिष त्याला सोडायला तयार नव्हते. त्याचे वेडेपणाचे ढोंगही त्याच्या विरुद्ध केले.

तो पळत सुटला. दूरदूर गेला तो कधीच परत आला नाही.

---

## सूर्यपर्वत


दोन शेतकरी भाऊ होते. मोठा खंडू व धाकटा विठू. खंडू स्वभावाने दुष्ट होता व पैशाचा फार लोभी होता. वडील वारल्यानंतर त्यांच्या वाटण्या झाल्या तेव्हा खंडूने विठूला एक कुऱ्हाड व फाटकी टोपली दिली.

धाकटा भाऊ विठू कष्टाळू व प्रामाणिक होता. तो त्याच्या मित्रांचा व शेजाऱ्यांचा आवडता होता. त्याला खंडूची वाटणी दुष्टपणाची वाटली पण त्याने तक्रार केली नाही. तो जंगलात जाऊन कुऱ्हाडीने लाकडे तोडून आणायचा व ती लाकडे विकून आपली गुजराण करायचा.

एक दिवस सकाळची न्याहारी करून नेहमीप्रमाणे तो जंगलात गेला. तो एका डोंगराच्या माथ्यावर आला. एवढ्यात त्याच्याजवळ एक मोठा गरूडपक्षी आला. गरुडाने त्याला विचारले, "तू येथे काय करीत आहेस?" विठूला आश्चर्य वाटले. "मी एक गरीब लाकूडतोड्या आहे." विठू म्हणाला. "मी येथे जंगलात येऊन रोज लाकडे तोडतो, बाजारात नेऊन विकतो आणि कशीबशी गुजराण करतो."

'हे खरे की खोटे?" गरुडाने विचारले. "अगदी खरे." विठू म्हणाला. "मग मी तुला मदत करीन." गरूड म्हणाला. "आता मी काय सांगतो ते ऐक. मी तुला सूर्यपर्वतावर सोने गोळा करायला घेऊन जातो. पण एक लक्षात ठेव. तू फक्त एकच सोन्याची चीप तुझ्यासाठी घ्यायची. जास्ती नाही. बाकीचे सोने गोळा करून नीट बांधून ठेवायचे." विठूने ते मान्य केले.

गरुडाने त्याला पाठीवर घेतले व गरूड त्याला घेऊन सूर्यपर्वतावर आला. तेथे सर्वत्र सोन्याचे ढीगच्या ढीग पडले होते. विठूने दिवसभर काम करून सोने एकत्र केले. गरुडाच्या सांगण्याप्रमाणे फक्त सोन्याची एक चीप त्याने घेतली. गरुडाने विठूला घरी परत आणून सोडले.



विठूने सोने विकून घोडे, गाई, मेंढ्या, डुकरे व कोंबड्या खरेदी केल्या. घर बांधले. हत्यारे-पात्यारे घेतली आणि कपडे व धान्य खरेदी केले. तो श्रीमंत झाला.

मोठ्या भावाने-खंडूने-विठूचे ऐश्वर्य पाहिले. त्याला हेवा वाटला. खंडू विठूला भेटायला आला. गोड गोड बोलून त्याने विठूकडून सर्व हकिकत काढून घेतली. विठूने भाबडेपणाने त्याला सर्व सांगितले.

दुसऱ्या दिवशी खंडू धाकट्या भावाप्रमाणे त्या डोंगरमाथ्यावर गेला. तेथे खंडू बसला असताना तोच गरूडपक्षी आला व त्याने खंडूला विचारले, "तू येथे काय करीत आहेस?" खंडू म्हणाला, "मी गरीब आहे. जंगलातील लाकडे तोडून विकतो व माझी उपजीविका करतो." गरुडाने विचारले, "हे खरे की खोटे?" तो म्हणाला, "अगदी खरे. मी गरीब आहे." गरूड म्हणाला, "हे जर खरे असेल तर मी तुला

सूर्यपर्वतावर सोने गोळा करायला घेऊन जातो. पण लक्षात ठेव. तेथे तू सोने गोळा कर. पण स्वतःसाठी फक्त एकच सोन्याची चीप घे. जास्त नाही."

खंडूने मान डोलावली आणि गरूड त्याला घेऊन सूर्यपर्वतावर गेला. सर्व पर्वत सोन्याच्या चिपांनी भरलेला होता. खंडूला लोभ सुटला. तो गरुडाची ताकीद विसरला. त्याने आपले सर्व खिसे सोन्याच्या चिपांनी भरले. स्वतःजवळची टोपलीपण सोन्याच्या चिपांनी भरली. नंतर त्याने इतर सोने गोळा केले. काम संपल्यावर तो परत जाण्यास निघाला.

पण तेवढ्यात सूर्याचा प्रकाश खूप प्रखर झाला आणि खंडू जळून भस्म झाला.

अतिलोभाचे फळ त्याला मिळाले.

---

२५/१२/००

## हुशार बादशहा

पर्शियाचा एक बादशहा विद्वान व शांतताप्रिय होता. त्याला लढाई आवडत नसे. तो अभ्यासात वेळ घालवी. दरबारातील मंत्र्यांशी चर्चा करीत किंवा राज्यातील लोकांत मिसळून त्यांची हालहवाल समजून घेई.

एकदा राज्यातील एक पंडित प्रवासाला निघाला. त्याचे घर मजबूत नव्हते. म्हणून त्याने एक हजार चांदीचे रुपये एका व्यापाऱ्याकडे ठेवायचे ठरविले. पंडित व्यापाऱ्याला म्हणाला, "माझे हे हजार रुपये तुझ्याजवळ सुरक्षित ठेव. प्रवासाहून परत आल्यावर मी घेऊन जाईन व तुला चांगले बक्षीस देईन."

प्रवासाहून परत आल्यानंतर पंडिताने व्यापाऱ्याजवळ पैसे मागितले. व्यापाऱ्याने त्याच्याकडे पैसे ठेवायला दिल्याचेच मान्य केले नाही. उलट अपशब्द बोलून त्याने पंडिताला हाकलून दिले. पंडित

फार खट्टू झाला. त्यांचे भांडण जोरात सुरू झाले. गर्दी जमली. लोकांनी तो व्यापारी चांगला आहे असे सांगितले. पंडित आपली फिर्याद घेऊन न्यायाधीशाकडे गेला, पण न्यायाधीशानेही व्यापाऱ्याच्या बाजूने न्याय दिला. मग पंडित बादशहाकडे गेला. बादशहाने थोडा विचार केला आणि नंतर पंडिताला म्हणाला, "मी आज सकाळी त्या व्यापाऱ्याला शहराबाहेरील बागेत तंबू ठोकून राहताना पाहिले. तू त्याच्या तंबूजवळ तीन दिवस बस. चौथ्या दिवशी मी तिकडून जाईन व तुझ्याशी बोलेन. मी बोलल्यानंतर तू मला सलाम कर आणि मग व्यापाऱ्याला पैशाबद्दल विचार आणि काय होते ते मला येऊन सांग."

पंडिताने बादशहाने सांगितल्याप्रमाणे तीन दिवस त्या व्यापाऱ्याच्या तंबूजवळ मुक्काम केला. चौथ्या दिवशी आपल्या लवाजम्यासह त्या बागेत आला. तो पंडिताजवळ थांबला व म्हणाला, "पंडित महाराज, सुखी व्हा." पंडिताने त्याला सलाम केला. पंडित मग व्यापाऱ्याच्या तंबूजवळ त्याला भेटण्यास गेला. गेले तीन दिवस तो व्यापारी पंडिताला पाहत होताच. पंडित जवळ येताच व्यापारी म्हणाला, "पंडित महाराज, तुम्ही मला केव्हा पैसे दिलेत हो? त्या वेळी कदाचित मी बाहेरगावी गेलो असेन व माझ्या कारभाऱ्याने पैसे घेतले असतील. मला पुन्हा एकदा सर्व नीट सांगा." पंडिताने सविस्तर हकिकत सांगितली. "हो, हो. बरोबर. आता मला आठवले. मला क्षमा करा." असं म्हणून व्यापारी पंडिताला घेऊन त्याच्या घरी गेला. त्याने पंडिताला त्याचे हजार रुपये परत केले. पंडिताने बादशहाकडे जाऊन ही बातमी सांगितली व त्याचे आभार मानले.

दुसऱ्या दिवशी सकाळी बादशहाच्या खाजगी कारभाऱ्याने वर्दी दिली की, "महाराज, एक मनुष्य राजवाड्याच्या दारात आला आहे. तो आपणास भेटू इच्छितो. त्याचे म्हणणे आहे की राज्यात न्याय राहिला नाही. न्यायाधीश अन्यायाने वागतात."

बादशहाने त्या माणसाला आत बोलाविले व त्याची तक्रार सांगण्यास सांगितले. तो म्हणाला, "महाराज, लांब प्रवासाला जाताना जोखीम नको म्हणून माझ्याजवळचे दोन हजार रुपये एका थैलीत घालून

ती सील करून येथील न्यायाधीशाकडे सुरक्षित ठेवण्यासाठी दिली. प्रवासाहून परत आल्यानंतर थैली घेऊन घरी आलो व थैली उघडली तर आत चांदीच्या रुपयांऐवजी तांब्याचे पैसे भरलेले होते. मी न्यायाधीशाला परत जाऊन विचारले तर त्याने मला शिव्या देऊन हाकलून दिले. तो म्हणतो की मी त्याला सील केलेली पिशवी दिली व ती त्याने जशीच्या तशी मला परत केली. पिशवीत काय होते ते त्याला माहीत नाही. तरी आपण मला गरिबाला न्याय द्या." बादशहा म्हणाला, "तू ती पिशवी घेऊन ये. मला पाहायची आहे."

त्या माणसाने ती पिशवी बरोबर आणली होतीच. ती त्याने बादशहाला दाखविली. त्याने ती पिशवी सर्व बाजूंनी काळजीपूर्वक पाहिली व ड्रावरमध्ये ठेवून दिली. त्या माणसाला दुसऱ्या दिवशी बोलाविले. तो माणूस निघून गेला.

रात्री राजवाड्यातील मंडळी झोपल्यानंतर बादशहा हळूच त्याच्या दरबारात आला व कोणी पाहत नाही याची खात्री झाल्यावर त्याने सिंहासनाच्या गादीच्या कापडाचा एक तुकडा फाडून खिशात ठेवला व पुन्हा महालात जाऊन तो झोपला.

सकाळी राजाचा कारभारी दरबाराच्या हॉलमध्ये आला व त्याने सिंहासनाची गादी फाटलेली पाहिली. तो घाबरला व त्याच्या मित्राकडे गेला व त्याला तो प्रकार सांगितला. "आता मी काय करू?" कारभारी म्हणाला. "बादशहाला दिसले तर मला फाशी होईल." "हे तू कोणाला सांगितले तर नाहीस ना?" मित्राने विचारले. कारभारी म्हणाला, "नाही. ते कोणाला अजून माहीत नाही." "मग काळजी करू नकोस." मित्र म्हणाला. "मला एक शिंपी माहिती आहे. तो कापड किंवा चामडे बेमालूम शिवून देतो. अगदी नव्यासारखे करून देतो." कारभारी त्या मित्राबरोबर ती फाटली गादी घेऊन शिंप्याकडे गेला व म्हणाला, "तू मागशील ते देतो. ही गादी ताबडतोब नव्यासारखी शिवून दे. ती फाटकी होती हे कोणाला कळता कामा नये." शिंप्याने बेमालूम काम केले. त्याने मागितली त्याच्या दुप्पट मजुरी कारभाऱ्याने दिली व गादी सिंहासनावर आणून ठेवली. थोड्या वेळाने बादशहाने दरबारात येताच

कारभाऱ्याला विचारले, "ही गादी कोणी दुरुस्त केली?" कारभारी खूप घाबरला. पण बादशहा म्हणाला, "घाबरू नकोस. तू माझा इमानी सेवक आहेस. ज्याने ही गादी पूर्ववत दुरुस्त केली त्या माणसाला मला भेटायचे आहे. मीच त्या गादीचे कापड फाडले होते."

कारभाऱ्याने त्या शिंप्याला बादशहासमोर हजर केले. "तू तर बेमालूम शिवणकाम करतोस." बादशहा म्हणाला. "मला तुझा अभिमान वाटतो. मला वाटते तू चामडे पण शिवतोस. तू कधी चामड्याची पैशाची पिशवी शिवली आहेस का?" शिंपी म्हणाला, "हो. तीन महिन्यांपूर्वी एकदा शिवली होती." बादशहाने विचारले, "तू पाहिलीस तर ओळखशील?" "हो. नक्कीच. ती सील केलेली होती व नाण्यांनी भरलेली होती."बादशहाने ड्रावरमधून पिशवी काढून त्याला दाखविली. शिंप्याने ती ताबडतोब ओळखली व तो म्हणाला, "हो, तीच ती. न्यायाधीशानी स्वतः ती माझ्याकडे दुरुस्तीसाठी आणली होती." शिंप्याला बक्षीस देऊन राजाने वाटेला लावले व न्यायाधीशाला बोलावणे पाठवले.

न्यायाधीश हजर झाला. त्याने सलाम केला. बादशहा त्याला म्हणाला, "तुझी सचोटी पाहून मी तुला मोठी न्यायाधीशाची जागा दिली. पण तू एका गरिबाला त्याचे दोन हजार रुपये लुबाडून फसविलेस. त्याने ते रुपये तुझ्याजवळ सुरक्षितपणे ठेवण्यासाठी दिले होते." "महाराज, माझ्या हातून असे दुष्कृत्य कधीही घडणार नाही. माझ्याकडे एक माणूस पैशाची थैली घेऊन आला होता. तिला सील होते. ती मी त्याला जशीच्या तशी परत केली. पण तो मला लुबाडू पाहतोय. त्याने मला चोर ठरवून तुमच्याकडे फिर्याद केली असेल." न्यायाधीश म्हणाला. "त्याने नाही. मीच तुझ्याविरुद्ध फिर्याद करीत आहे." असं म्हणून त्याने त्याच्यापुढे ती पिशवी टाकली. "तू दुसऱ्या बाजूने ती पिशवी उघडून चांदीचे रुपये काढून घेतलेस व आत तांब्याचे पैसे भरून ती पिशवी बेमालूम शिवून घेतलीस व त्या गरिबाला फसविलेस. तसेच एका पंडिताने व्यापाऱ्याविरुद्ध तुझ्याकडे फिर्याद दिली तर तू व्यापाऱ्याच्या बाजूने खोटा न्याय दिलास." न्यायाधीश निरुत्तर झाला.

बादशहाने त्याला दोन हजार रुपये आणायला घरी पाठवले व ते रुपये येताच त्या गरीब माणसाला दिले. न्यायाधीशाला तुरुंगाची कोठी दाखविली.

एके दिवशी उद्यानात फिरत असता त्याला तेथे एक तरुण मुलगा दिसला. बादशहाने विचारले, "तू कोण आहेस? येथे काय करीत आहेस?" तो म्हणाला, "महाराज, आपल्या भेटीसाठीच मी येथे उभा आहे. काही दिवसांपूर्वी लांबच्या प्रवासाहून घरी परत आलो. संध्याकाळी मी डाळिंबाच्या बागेच्या मालकाकडे गेलो व मी त्याच्याकडे शंभर सोन्याची नाणी सुरक्षित ठेवली होती ती परत मागितली. तर त्याने मला मूर्ख ठरविले व धुडकावून लावले. एवढेच नव्हे, तर माझ्यावर कुत्रे सोडले व मला पळता भुई थोडी झाली. मी कसाबसा घरी पोचलो. मला तुम्ही पंडिताला दिलेला न्याय समजला, म्हणून मी आपल्याकडे येण्याचे धाडस केले." बादशहाने तरुणाच्या धाडसाचे कौतुक केले.

बादशहाने त्या मालकाला बोलाविले. बादशहा त्या तरुणाला घेऊन राजवाड्यात गेला. थोड्या वेळाने तो बागेचा मालक आला. बादशहा त्याला म्हणाला, "या तरुणाने सुरक्षित ठेवण्यासाठी शंभर सोन्याची नाणी तुझ्याजवळ दिली होती का?" "नाही महाराज." मालक म्हणाला. बादशहा तरुणाकडे वळून म्हणाला, "तू सोन्याची नाणी दिलीस तेव्हा तेथे कोणी हजर होते का?" "नाही महाराज." तरुण म्हणाला. "तू पैसे कोठे दिलेस?" बादशहाने विचारले. "वडाच्या झाडाखाली मालकांना दिले." तरुणाने सांगितले. बादशहाने विचारले, "मग तू कोणी हजर नव्हते असं का म्हणतोस? झाड हजर होते ना? जा. त्या झाडाजवळ जा. झाडावर तुझे ओठ टेकव व हळूच त्याला सांग 'बादशहाने तुला बोलावले आहे'." "महाराज, माणसासारखे साक्ष देण्यासाठी ते झाड कसे येईल?" तरुणाने विचारले. "तू काळजी करू नको." बादशहा म्हणाला. "ही माझी अंगठी घेऊन जा. ती झाडाला दाखव. झाड तुझी मदत करील."

तो तरुण बादशहाची अंगठी घेऊन झाडाकडे निघाला. त्याला परत येण्यास बराच वेळ लागणार होता. बादशहाने नृत्य करणाऱ्या कलावंतांना बोलाविले व नाचगाणे सुरू केले. मालक नाचगाण्यात

रंगून गेला आणि आपणाला कशासाठी बोलावले आहे ते विसरून गेला.

काही वेळाने बादशहाने मालकाला सहज विचारले, "तो तरुण त्या वडाच्या झाडाशी पोचला असेल का?" "नाही नाही. अजून थोडा वेळ लागले." मालक बोलून गेला.

त्या तरुणाने त्या वडाच्या झाडाखाली जाताच बादशहाने सांगितल्याप्रमाणे केले व तो परत फिरला. दोन तासांनी तो राजवाड्यात परत आला. बादशहाला त्याने अंगठी परत केली. तो निराश दिसत होता. बादशहा म्हणाला, "ते झाड आत्ताच साक्ष देऊन गेले." तरुणाला आश्चर्याचा धक्का बसला. मालकही आश्चर्यचकित झाला. मालक म्हणाला, "झाड केव्हा आले? काय साक्ष देऊन गेले? आपण तर नाचगाणे ऐकण्यात दंग झालो होतो. महाराज, कोणी आल्याचे मला तरी आठवत नाही."

"खरं आहे" बादशहा म्हणाला. "झाड आले नव्हते. पण मी जेव्हा तुला विचारले, 'तो तरुण त्या वडाच्या झाडाशी पोचला असेल का?' तेव्हा तू 'अजून नाही' असं म्हणालास. त्या झाडाखाली पैसे घेतल्याची नकळत तू कबुली दिलीस."

मालकाने लाजेने मान खाली घातली व राजाची क्षमा मागितली. त्याने त्याच दिवशी त्या तरुणाला शंभर सोन्याची नाणी परत केली.

बादशहाने दंड म्हणून आणखी शंभर सोन्याची नाणी मालकाकडून घेतली व त्या तरुणाला दिली.

त्या दिवशी संध्याकाळी बादशहाने मोठ्या मेजवानीचा बेत केला व ज्या तिघांना त्याने न्याय दिला त्यांच्या समवेत भोजन केले.

---

२४९३ २५।५।९०

## दोन भाऊ

एका शेतकऱ्याला लखू नावाचा मुलगा होता. लखू फार देखणा व हुशार होता. तो दोन वर्षांचा असताना त्याची आई वारली व शेतकऱ्याने दुसरे लग्न केले. ती बाई फार दुष्ट होती. पुढे तिला मुलगा झाला. त्याचे लहानू असे नाव ठेवण्यात आले. ती बाई लहानूला छान छान कपडे देई व त्याच्यावर खूप प्रेम करी. पण मोठ्या लखूचा ती छळ करी. लखूला शिळेपाके खावे लागे व फाटके कपडे घालावे लागत. शिवाय त्याला शेतात काम करावे लागे आणि जंगलातून लाकडे आणावी लागत.

पण असे असूनही धाकटा लहानू दुबळा व अशक्त होता. आईने त्यांच्या कामाची वाटणी केली होती. लहानूला चांगली जमीन व मोठा बैल दिला होता. तर लखूला खडकाळ जमीन व एक काळा कुत्रा दिला होता. असं असूनही लखू नाखूष नव्हता. तो सशक्त आणि कष्टाळू होता.

लखूने खडकाळ जमिनीवर एक झोपडी बांधली. त्याने एक झाड तोडून नांगर तयार केला. त्या कुत्र्याला नांगराला बांधले व सगळीकडे पावाचे तुकडे टाकले. पावाच्या आशेने कुत्रा नांगर घेऊन सर्वत्र फिरे व लखूची जमीन नांगरली जाई. त्या नांगरलेल्या जमिनीत लखूने धान्य पेरले व चांगली मशागत केली. त्याला भरघोस पीक मिळाले. धान्याने त्याचे कोठार भरले.

लहानू आळशी होता. त्याचे शेत चांगले असूनही त्याच्या शेतात काहीच पिकले नाही. मग त्याने विचार केला. लखूला चांगले पीक आले याचे कारण त्याचा कुत्रा असावा. त्याने लखूजवळ काही दिवसांसाठी कुत्रा उसना मागितला. लखूने त्याला कुत्रा दिला पण कुत्रा त्याच्याकडे जाईना. लहानू रागावला व त्याने कुत्र्याला ठार केले. लखूला फार वाईट वाटले. त्याने कुत्र्याचे प्रेत आपल्या शेतात पुरले.



काही दिवसांनी तेथे बांबूचे मोठे बेट उगवले. जेव्हा लखूने बांबू हलविले तेव्हा खाली सोन्याची नाणी पडली. तो श्रीमंत झाला. लहानूला त्याचा हेवा वाटला व राग आला. लखू बाहेर गेला असता लहानू त्याच्या शेतात गेला व त्याने बांबूचे बेट जोरात हलविले पण सोन्याच्या नाण्याऐवजी त्याच्या डोक्यावर बरीच घाण पडली. त्याला राग आला व त्याने बांबू कापून टाकले.

लखू परत आला. त्याने ते पाहिले व त्याला वाईट वाटले. त्याने सर्व बांबू गोळा केले व जमिनीत पुरले. काही दिवसांनी तेथे आपोआप मोठे कलिंगडाचे वेल उगवले व त्याला खूप मोठी कलिंगडे लागली. त्या बागेची राखण करण्यासाठी त्याने एका प्रचंड कलिंगडाच्या आतील गर आणि बिया काढून टाकल्या व तो कलिंगडात लपून बसला. लखूला झोप लागली. जेव्हा त्याला जाग आली तेव्हा तो त्याच्या शेतात नव्हता. तर एका मोठ्या खडकाजवळ होता. तेथे खूप माकडे होती व घुबड मंत्र म्हणत होते. तो कलिंगडाच्या आतून सर्व पाहत होता. त्या कलिंगडाची पूजा करण्यात येत होती आणि समोर सोन्याच्या वाट्यांतून हिरे-रत्नमाणके ठेवण्यात आली होती. त्या कलिंगडाची

पूजा करून ते देवाला अर्पण करण्यात येत होते.

लखूने त्या कलिंगडातून बाहेर जोरात उडी मारली. घुबड उडून गेले व माकडे पळून गेली. त्याने सर्व संपत्ती गोळा केली आणि तो घरी आला.

ही बातमी जेव्हा लहानूला समजली तेव्हा त्याचा मत्सर वाढू लागला. तो एक दिवस लखूच्या मळयात गेला व लखूची नक्कल करीत एक कलिंगड पोखरून त्यात बसला व माकडांची वाट पाहू लागला.

थोड्या वेळाने माकडे आली. त्या सर्वांनी मिळून ते कलिंगड उचलले व ते डोंगरातील कड्यावरील खडकाकडे गेले. त्या वेळी तेथे सोन्याच्या वाट्या व हिरेमाणके नव्हती. मंत्र म्हणणारे घुबडही नव्हते.

त्या खडकाजवळ येताच त्या माकडांनी ते कलिंगड कड्यावरून खाली खोल दरीत फेकून दिले. कलिंगडाचे व आतील लहानूचे तुकडे तुकडे झाले.

नंतर घुबड आले. सर्व माकडे देवाला बळी दिल्याबद्दल आनंदाने नाचू लागली.

---

## अडाणी माणसं

एका टेकडीवर आलीशान राजवाड्यात राहणाऱ्या छोट्या राजुपत्राची ही गोष्ट आहे. राजपुत्र विजय मोठ्या श्रीमंतीत वाढत होता. त्याला छान छान कपडे होते व त्याला चांगले खायला-प्यायला मिळत होते. त्याच्याकडे लक्ष ठेवायला दास-दासी होत्या व मेरी नावाची शिक्षिका होती. त्याच्याजवळ मोती नावाचा एक सुंदर कुत्रा होता.

त्या टेकडीच्या पायथ्याशी एक छोटे गाव होते. त्या गावात एक झाडूवाला राहत होता. त्या झाडूवाल्याचा मुलगा श्याम राजपुत्र विजयच्या वयाचाच होता. श्याम फाटके-तुटके कपडे घालीत असे व त्याला खायलाप्यायला धड मिळत नव्हते. तो उकिरड्यावर खेळत

असे व एका मोडक्या झोपडीत राहत असे. पण हा फरक सोडला तर विजय व श्याम या दोन मुलांत कमालीचे साम्य होते. जुळ्या भावांसारखे ते अगदी सारखे दिसत. त्यांचे कपडे काढून त्यांना जवळजवळ उभे केले तर त्यांना वेगळे ओळखणे अशक्य होते. केवळ अंगावरील कपड्यांनीच त्यांना ओळखता येत होते. विजयला त्या श्यामचा हेवा वाटत असे. कारण श्याम स्वच्छंदपणे नदीमध्ये डुंबत असे. पण राजपुत्राला तसे कोणी करू देत नसे. मेरीला वाटे की त्या दोघांना एकत्र खेळू द्यावे. पण तिला तशी परवानगी नव्हती. त्यामुळे मेरीला वाईट वाटे कारण मुलांना काय आवडते ते तिला माहीत होते.

एकदा मेरी राजपुत्र विजय व त्याचा कुत्रा मोती यांना घेऊन नदीकाठाने फिरत असताना श्याम व त्याचा कुत्रा टिपू भेटले. मोतीने टिपूच्या नाकाला स्पर्श करून दोस्ती केली. दोन्ही मुलांनी ते पाहिले व ते एकमेकांकडे पाहून हसले. त्यानंतर ते दोघे अनेक वेळा एकमेकांना भेटत व हात हलवून मैत्री दाखवीत. एकदा असेच ते भेटले असता श्यामने विजयला अंगठ्याने नदी दाखविली व पाण्यात डुंबायला येतोस का अशी खूण केली. राजपुत्राने मेरीकडे पाहिले. तिने नकारात्मक मान हलवली. मग विजयनेही तसेच केले.

दोन दिवसांनी मेरी राजवाड्यात गेली तर एकच गोंधळ उडाला होता. विजय कोठे सापडत नव्हता. मेरी व विजयच्या रक्षकदासी खूप घाबरल्या. अनेक नोकर राजपुत्राला शोधीत होते. काही नोकर खालच्या गावात गेले व सर्वत्र चौकशी करू लागले. मेरी पण टेकडीखालील गावात गेली. चौकशी करता करता तिला तो झाडूवाला दिसला. तिने त्याला विचारले. तो म्हणाला, "हो, हो. एक तासापूर्वी मी त्याला पाहिले होते. राजपुत्र विजय व माझा मुलगा श्याम नदीवर जात होते." मेरी, रक्षकदासी व एक नोकर नदीकडे धावले. तो झाडूवालाही त्यांच्याबरोबर गेला. लोकांचीही खूप गर्दी जमा झाली.

उन्हाळ्याचे दिवस होते. नदीला फारसे पाणी नव्हते. सर्वांनी नदीकडे पाहिले. त्या नदीच्या मध्यभागी वाहणाऱ्या पाण्यात ते दोन मुलगे त्यांच्या जन्मजात पोषाखात आनंदाने डुंबत होते. एकमेकांच्या

पूजा करून ते देवाला अर्पण करण्यात येत होते.

लखूने त्या कलिंगडातून बाहेर जोरात उडी मारली. घुबड उडून गेले व माकडे पळून गेली. त्याने सर्व संपत्ती गोळा केली आणि तो घरी आला.

ही बातमी जेव्हा लहानूला समजली तेव्हा त्याचा मत्सर वाढू लागला. तो एक दिवस लखूच्या मळयात गेला व लखूची नक्कल करीत एक कलिंगड पोखरून त्यात बसला व माकडांची वाट पाहू लागला.

थोड्या वेळाने माकडे आली. त्या सर्वांनी मिळून ते कलिंगड उचलले व ते डोंगरातील कड्यावरील खडकाकडे गेले. त्या वेळी तेथे सोन्याच्या वाट्या व हिरेमाणके नव्हती. मंत्र म्हणणारे घुबडही नव्हते.

त्या खडकाजवळ येताच त्या माकडांनी ते कलिंगड कड्यावरून खाली खोल दरीत फेकून दिले. कलिंगडाचे व आतील लहानूचे तुकडे तुकडे झाले.

नंतर घुबड आले. सर्व माकडे देवाला बळी दिल्याबद्दल आनंदाने नाचू लागली.

---

## अडाणी माणसं

एका टेकडीवर आलीशान राजवाड्यात राहणाऱ्या छोट्या राजुपत्राची ही गोष्ट आहे. राजपुत्र विजय मोठ्या श्रीमंतीत वाढत होता. त्याला छान छान कपडे होते व त्याला चांगले खायला-प्यायला मिळत होते. त्याच्याकडे लक्ष ठेवायला दास-दासी होत्या व मेरी नावाची शिक्षिका होती. त्याच्याजवळ मोती नावाचा एक सुंदर कुत्रा होता.

त्या टेकडीच्या पायथ्याशी एक छोटे गाव होते. त्या गावात एक झाडूवाला राहत होता. त्या झाडूवाल्याचा मुलगा श्याम राजपुत्र विजयच्या वयाचाच होता. श्याम फाटके-तुटके कपडे घालीत असे व त्याला खायलाप्यायला धड मिळत नव्हते. तो उकिरड्यावर खेळत

असे व एका मोडक्या झोपडीत राहत असे. पण हा फरक सोडला तर विजय व श्याम या दोन मुलांत कमालीचे साम्य होते. जुळया भावांसारखे ते अगदी सारखे दिसत. त्यांचे कपडे काढून त्यांना जवळजवळ उभे केले तर त्यांना वेगळे ओळखणे अशक्य होते. केवळ अंगावरील कपड्यांनीच त्यांना ओळखता येत होते. विजयला त्या श्यामचा हेवा वाटत असे. कारण श्याम स्वच्छंदपणे नदीमध्ये डुंबत असे. पण राजपुत्राला तसे कोणी करू देत नसे. मेरीला वाटे की त्या दोघांना एकत्र खेळू द्यावे. पण तिला तशी परवानगी नव्हती. त्यामुळे मेरीला वाईट वाटे कारण मुलांना काय आवडते ते तिला माहीत होते.

एकदा मेरी राजपुत्र विजय व त्याचा कुत्रा मोती यांना घेऊन नदीकाठाने फिरत असताना श्याम व त्याचा कुत्रा टिपू भेटले. मोतीने टिपूच्या नाकाला स्पर्श करून दोस्ती केली. दोन्ही मुलांनी ते पाहिले व ते एकमेकांकडे पाहून हसले. त्यानंतर ते दोघे अनेक वेळा एकमेकांना भेटत व हात हलवून मैत्री दाखवीत. एकदा असेच ते भेटले असता श्यामने विजयला अंगठ्याने नदी दाखविली व पाण्यात डुंबायला येतोस का अशी खूण केली. राजपुत्राने मेरीकडे पाहिले. तिने नकारात्मक मान हलवली. मग विजयनेही तसेच केले.

दोन दिवसांनी मेरी राजवाड्यात गेली तर एकच गोंधळ उडाला होता. विजय कोठे सापडत नव्हता. मेरी व विजयच्या रक्षकदासी खूप घाबरल्या. अनेक नोकर राजपुत्राला शोधीत होते. काही नोकर खालच्या गावात गेले व सर्वत्र चौकशी करू लागले. मेरी पण टेकडीखालील गावात गेली. चौकशी करता करता तिला तो झाडूवाला दिसला. तिने त्याला विचारले. तो म्हणाला, "हो, हो. एक तासापूर्वी मी त्याला पाहिले होते. राजपुत्र विजय व माझा मुलगा श्याम नदीवर जात होते." मेरी, रक्षकदासी व एक नोकर नदीकडे धावले. तो झाडूवालाही त्यांच्याबरोबर गेला. लोकांचीही खूप गर्दी जमा झाली.

उन्हाळयाचे दिवस होते. नदीला फारसे पाणी नव्हते. सर्वांनी नदीकडे पाहिले. त्या नदीच्या मध्यभागी वाहणाऱ्या पाण्यात ते दोन मुलगे त्यांच्या जन्मजात पोषाखात आनंदाने डुंबत होते. एकमेकांच्या

अंगावर पाणी उडवीत होते. हसत-खिदळत होते. नदीच्या काठावर त्यांनी आपले कपडे काढून ठेवले होते. सर्वांनी ओरडून त्या दोघांना बाहेर बोलावले. पण त्यांचे लोकांकडे लक्षच नव्हते. ते मजेत खेळत होते.

शेवटी तो झाडूवाला पाण्यात गेला आणि त्या दोघांना बाहेर घेऊन आला. ते दोघेही नागवे थंडीने कुडकुडत लोकांसमोर उभे राहिले. त्या दोघांमध्ये इतके साम्य होते की, राजपुत्र कोण आणि श्याम कोण हे समजत नव्हते. यामुळे कोणी कोणाला रागवावे ते कळत नव्हते. पाण्याने अगदी स्वच्छ झालेले दोघेजण अगदी सारखे दिसत होते. त्या मुलांनाही हे समजत होते की आम्ही त्यांना वेगळे ओळखू शकत नव्हतो. त्यामुळे तेही चेकाळले होते.

मग मेरीला एक युक्ती सुचली. मेरीने त्यांना कपडे घालावयास सांगितले. त्यांनी कपडे घातले की त्यांना वेगळे ओळखता येईल अशी तिची खात्री होती. पण मुलांनी गंमतच केली. एकाने फाटकी चड्डी आणि वर राजपुत्राचा सॅटिनचा कोट घातला. तर दुसऱ्याने सॅटिनची रंगीत चड्डी आणि वर फाटका कोट घातला. त्यामुळे कोणता कोण याचा पत्ता लागेना. मग झाडूवाल्याने व रक्षकदासीने त्यांना एक एक थप्पड मारली. दोघेही रडले व ओरडले. पण दोघांचे रडणेही इतके सारखे होते की त्यावरून श्रीमंत कोण व गरीब कोण हा फरक स्पष्ट झाला नाही.

राजपुत्राची रक्षकदासी म्हणाली, "हे कठीण काम आहे. हे कोडं कधीच सुटणार नाही. मी राजपुत्र म्हणून झाडूवाल्याचा मुलगा राजवाड्यात घेऊन जाईन आणि राजपुत्र झाडूवाल्याचा मुलगा म्हणून मोठा होईल. आपल्याला त्यांना कधीच ओळखता येणार नाही काय? आपण सर्व इतके मूर्ख आहोत काय?"

सर्वजण डोके खाजवीत विचारात पडले होते. पुढे काय करावे हे कोणालाच सुचत नव्हते. एवढ्यात भुंकण्याचा आवाज आला. मोती व टिपू हे त्यांचे कुत्रे भुंकत येत होते. ते कुत्रे खेळत-बागडत मुलांजवळ गेले. टिपूने सॅटिन कोट घातलेल्या मुलाच्या तोंडाला हुंगले तर मोतीने फाटका कोट घातलेल्या मुलाला चाटले. कुत्र्यांनी त्यांना बरोबर

ओळखले होते.

कुत्र्यांना कोणता कोण हा प्रश्नच नव्हता. मग त्या दोन्ही मुलांना कपडे बदलायला लावले. झाडूवाला त्याच्या मुलाला व टिपूला घेऊन घरी गेला.

रक्षकदासी आणि मेरी राजपुत्राला व मोतीला राजवाड्यावर घेऊन गेल्या.

संध्याकाळ झाली होती. दोन्ही मुलांना त्या संध्याकाळी एक प्रकारचे भरपूर जेवण मिळाले. शिक्षा म्हणून दोघांनाही उपाशीपोटी झोपावे लागले.

पण एक प्रश्न शिल्लक राहिलाच. कुत्र्यांनी त्या दोन मुलांना कसे बरोबर ओळखले. आम्हा माणसांना हे का जमले नाही? आम्ही माणसं इतकी अडाणी कशी?

---

## स्पायडरमॅन अनानसे

स्पायडरमॅन अनानसेच्या खूप गोष्टी प्रसिद्ध आहेत. मूळ आफ्रिकेतून या गोष्टी आल्या आणि जगभर पसरल्या. जगातील सर्व देशांतील मुलांना या गोष्टी आवडतात. दूरदर्शनवर तुम्ही स्पायडरमॅनचे पराक्रम पाहिले आहेतच. अनानसेने आकाशात जाऊन स्वर्गातील देवाकडून पृथ्वीवरच्या मुलांसाठी या गोष्टी कशा आणल्या त्याची गोष्ट मी आज सांगणार आहे. स्वर्गातील देवाजवळ खूप गोष्टी आहेत हे अनानसे नावाच्या कोळयाला समजले. त्याने विचार केला की देवाजवळून या गोष्टी पृथ्वीवर आणाव्यात.

अनानसेने मोठे जाळे विणून तयार केले आणि त्यावर चढून तो आकाशात देवाच्या घरी पोचला. आकाशदेव मोठ्या सिंहासनावर बसला होता. त्याने अनानसेचे स्वागत केले व विचारले, “काय काम आहे?” अनानसे म्हणाला, “महाराज, [illegible] लहान मुलांसाठी

अंगावर पाणी उडवीत होते. हसत-खिदळत होते. नदीच्या काठावर त्यांनी आपले कपडे काढून ठेवले होते. सर्वांनी ओरडून त्या दोघांना बाहेर बोलावले. पण त्यांचे लोकांकडे लक्षच नव्हते. ते मजेत खेळत होते.

शेवटी तो झाडूवाला पाण्यात गेला आणि त्या दोघांना बाहेर घेऊन आला. ते दोघेही नागवे थंडीने कुडकुडत लोकांसमोर उभे राहिले. त्या दोघांमध्ये इतके साम्य होते की, राजपुत्र कोण आणि श्याम कोण हे समजत नव्हते. यामुळे कोणी कोणाला रागवावे ते कळत नव्हते. पाण्याने अगदी स्वच्छ झालेले दोघेजण अगदी सारखे दिसत होते. त्या मुलांनाही हे समजत होते की आम्ही त्यांना वेगळे ओळखू शकत नव्हतो. त्यामुळे तेही चेकाळले होते.

मग मेरीला एक युक्ती सुचली. मेरीने त्यांना कपडे घालावयास सांगितले. त्यांनी कपडे घातले की त्यांना वेगळे ओळखता येईल अशी तिची खात्री होती. पण मुलांनी गंमतच केली. एकाने फाटकी चड्डी आणि वर राजपुत्राचा सॅटिनचा कोट घातला. तर दुसऱ्याने सॅटिनची रंगीत चड्डी आणि वर फाटका कोट घातला. त्यामुळे कोणता कोण याचा पत्ता लागेना. मग झाडूवाल्याने व रक्षकदासीने त्यांना एक एक थप्पड मारली. दोघेही रडले व ओरडले. पण दोघांचे रडणेही इतके सारखे होते की त्यावरून श्रीमंत कोण व गरीब कोण हा फरक स्पष्ट झाला नाही.

राजपुत्राची रक्षकदासी म्हणाली, “हे कठीण काम आहे. हे कोडं कधीच सुटणार नाही. मी राजपुत्र म्हणून झाडूवाल्याचा मुलगा राजवाड्यात घेऊन जाईन आणि राजपुत्र झाडूवाल्याचा मुलगा म्हणून मोठा होईल. आपल्याला त्यांना कधीच ओळखता येणार नाही काय? आपण सर्व इतके मूर्ख आहोत काय?”

सर्वजण डोके खाजवीत विचारात पडले होते. पुढे काय करावे हे कोणालाच सुचत नव्हते. एवढ्यात भुंकण्याचा आवाज आला. मोती व टिपू हे त्यांचे कुत्रे भुंकत येत होते. ते कुत्रे खेळत-बागडत मुलांजवळ गेले. टिपूने सॅटिन कोट घातलेल्या मुलाच्या तोंडाला हुंगले तर मोतीने फाटका कोट घातलेल्या मुलाला चाटले. कुत्र्यांनी त्यांना बरोबर

ओळखले होते.

कुत्र्यांना कोणता कोण हा प्रश्नच नव्हता. मग त्या दोन्ही मुलांना कपडे बदलायला लावले. झाडूवाला त्याच्या मुलाला व टिपूला घेऊन घरी गेला.

रक्षकदासी आणि मेरी राजपुत्राला व मोतीला राजवाड्यावर घेऊन गेल्या.

संध्याकाळ झाली होती. दोन्ही मुलांना त्या संध्याकाळी एक प्रकारचे भरपूर जेवण मिळाले. शिक्षा म्हणून दोघांनाही उपाशीपोटी झोपावे लागले.

पण एक प्रश्न शिल्लक राहिलाच. कुत्र्यांनी त्या दोन मुलांना कसे बरोबर ओळखले. आम्हा माणसांना हे का जमले नाही? आम्ही माणसं इतकी अडाणी कशी?

---

## स्पायडरमॅन अनानसे

स्पायडरमॅन अनानसेच्या खूप गोष्टी प्रसिद्ध आहेत. मूळ आफ्रिकेतून या गोष्टी आल्या आणि जगभर पसरल्या. जगातील सर्व देशांतील मुलांना या गोष्टी आवडतात. दूरदर्शनवर तुम्ही स्पायडरमॅनचे पराक्रम पाहिले आहेतच. अनानसेने आकाशात जाऊन स्वर्गातील देवाकडून पृथ्वीवरच्या मुलांसाठी या गोष्टी कशा आणल्या त्याची गोष्ट मी आज सांगणार आहे. स्वर्गातील देवाजवळ खूप गोष्टी आहेत हे अनानसे नावाच्या कोळयाला समजले. त्याने विचार केला की देवाजवळून या गोष्टी पृथ्वीवर आणाव्यात.

अनानसेने मोठे जाळे विणून तयार केले आणि त्यावर चढून तो आकाशात देवाच्या घरी पोचला. आकाशदेव मोठ्या सिंहासनावर बसला होता. त्याने अनानसेचे स्वागत केले व विचारले, "काय काम आहे?" अनानसे म्हणाला, "महाराज, तुमच्याजवळ लहान मुलांसाठी

खूप गोष्टी आहेत. त्यांपैकी काही मला पृथ्वीवरच्या मुलांसाठी पाहिजेत. त्यासाठी मी आलो आहे. गोष्टींच्या बदल्यात मी तुम्हांला काय देऊ?" आकाशदेवाला खूप हसू आले. देव म्हणाला, "तू फार गमतीदार मुलगा आहेस. मी तुला गोष्टी देईन, पण त्यापूर्वी तू मला तीन वस्तू आणून दिल्या पाहिजेस. एक-अक्राळ विक्राळ दात असलेला चित्ता, दोन-आगीसारख्या डंख असणाऱ्या गांधीलमाशा, आणि तिसरी गोष्ट म्हणजे एक वनपरी तू मला आणून दे." आकाशदेवाने अशा अवघड अटी अनानसेला घातल्या व तो खूप जोरजोराने हसू लागला. पण अनानसे डगमगला नाही. तो म्हणाला, "ठीक आहे. ह्या तिन्ही गोष्टी मी तुम्हांला आणून देईन व मुलांसाठी गोष्टी घेऊन जाईन." आकाशदेव हसून म्हणाला, "तुला या गोष्टी कशा मिळतील? चित्ता तुला फाडून खाईल, गांधीलमाशा डंख करतील आणि परी तर तुला दिसणारच नाही."

अनानसे काही न बोलता जाळयावरून खाली उतरला. त्याला त्या



तिन्ही वस्तू मिळतील याची खात्री वाटत होती. जंगलात खूप हिंडल्यावर भेसूर दातांचा एक चित्ता एका झाडाजवळ बसलेला त्याला दिसला. चित्त्याने विचारले, "तू माझ्या न्याहारीसाठी आला आहेस का?" अनानसे म्हणाला, "ते नंतर बघू. प्रथम आपण एक खेळ खेळू या." चित्त्याला खेळ खेळणे फार आवडते हे त्याला माहीत होते. चित्त्याने विचारले, "कोणता खेळ?" "प्रथम मी तुझे पाय बांधतो. नंतर तू माझे पाय बांध." चित्त्याला मजा वाटली. त्याने विचार केला की अनानसेला पाय बांधून झाडावर टांगावे आणि नंतर खावे.. पण अनानसेने युक्तीने चित्त्याचे पाय बांधून त्याला झाडाला घट्ट बांधून टाकले. अनानसे त्याला म्हणाला, "आपण लवकरच आकाशातील देवाला भेटायला जाऊ. पण तत्पूर्वी मला आणखी दोन वस्तू देवासाठी आणायच्या आहेत." अनानसे मोठ्याने हसत निघून गेला.

आणखी दूर गेल्यावर त्याला एक केळींचे बन दिसले. त्यापासून जवळच एक गांधीलमाशांचे पोळे दिसले. त्याने एक कमंडलू पाण्याने भरून घेतले व तो गांधीलमाशा पकडायला निघाला. त्याने केळीचे एक पान घेतले व पोळयावर धरले आणि कमंडलूतले पाणी त्या पानावर हळूहळू ओतायला सुरुवात केली. गांधीलमाशांना वाटले की पाऊस पडू लागला. त्या पोळयाभोवती घिरट्या घालू लागल्या. अनानसे त्यांना म्हणाला, "या रिकाम्या कमंडलूत बसा म्हणजे तुम्हाला पाऊस लागणार नाही." अनानसेचे आभार मानून त्या गांधीलमाशा दाटीवाटीने कमंडलूत बसल्या. अनानसेने चटकन कमंडलूचे तोंड बंद केले व कमंडलू चित्त्याजवळ नेऊन ठेवले. तो गांधीलमाशांना म्हणाला, "आपण लवकरच आकाशातील देवाला भेटायला जाऊ. माझी वाट पाहत येथेच थांबा. मी थोड्या वेळात येतोच."

मग अनानसेने हातात भांडे असलेली एक बाहुली तयार केली. वेलीचे एक टोक बाहुलीच्या केसांना घट्ट बांधले व एका झाडाजवळ बाहुलीला ठेवले. बाहुलीभोवती लाल रंगाची सुंदर फुले ठेवली. वेलीचे दुसरे टोक धरून अनानसे लांब झाडीत लपून बसला. बाहुलीजवळील भांड्यात त्याने चांगले वडे ठेवले व बाहुलीच्या सर्व अंगाला घट्ट डिंक

लावून ठेवला. अनानसे लपून बसलेल्या ठिकाणाहून परीची वाट पाहत बसला. त्याच्या अपेक्षेप्रमाणे एक परी आली. परीला लाल फुले फार आवडली. तिने वडेही प्रेमाने खाल्ले. तिने बाहुलीचे आभार मानले पण बाहुली उत्तर देईना. परीला राग आला. परीने बाहुलीला बोलण्याचा आग्रह केला. पण बाहुली गप्पच. परीने चिडून बाहुलीचे तोंड हाताने धरले, तर परीचा हात चिकटून बसला. परीने दुसऱ्या हाताने बाहुलीच्या जोरात तोंडात मारली तर परीचा दुसराही हात चिकटून बसला. परीचे दोन्ही हात सुटेनात. परीने बाहुलीला पायाने लाथाडून दिले तर परीचे दोन्ही पाय बाहुलीला चिकटले. अनानसे झाडाआडून सर्व पाहत होता. त्याला खूप हसू आले. त्याने वेलीचे टोक ओढून बाहुलीला व परीला चित्त्याच्या झाडाजवळ आणून बसविले. तेथे गांधील माशा कमंडलूत ठेवल्या होत्याच.

मग अनानसेने खूप उंच जाळे बांधले व त्या तिघांना घेऊन तो स्वर्गात आकाशदेवाकडे गेला. तिन्ही वस्तू त्याने आकाशदेवाच्या पायाजवळ ठेवल्या व नमस्कार केला. अनानसे म्हणाला, "तुमच्या सांगण्याप्रमाणे मी तिन्ही वस्तू आणल्या आहेत. त्यांचा स्वीकार करा. आता मला काही गोष्टी द्या."

आकाशदेव अनानसेवर खूष झाला. त्याने आपल्याजवळच्या लहान मुलांच्या खूप गोष्टी अनानसेला दिल्या.

त्या गोष्टी घेऊन व आकाशदेवाचे आभार मानून अनानसे परत पृथ्वीवर आला. त्याने त्या सर्व गोष्टी आफ्रिकेतल्या मुलांना प्रथम सांगितल्या. नंतर हळूहळू त्या गोष्टी जगभर पसरल्या.

तेव्हापासून स्पायडरमॅनच्या ह्या गोष्टी सर्व जगभर मुलांच्या फार आवडत्या झाल्या.

---

BVBK-0401662

BVBK-0401662